महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / फ्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ५० वा | बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मराठ्यांना कुणबी दाखले देण्यास सुरुवात करावी

## मंत्रिमंडळ उपसमितीचे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले निर्देश

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** हैदराबाद गॅझेटसंदर्भात जारी करण्यात आलेल्या शासननिर्णयाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी, असे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने राज्यातील विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ उपसमितीने अतिशय विचारपूर्वक निर्णय घेतले आहेत व त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय मागे घेण्याचा कोणताही प्रश्न नाही, असे उपसमितीचे अध्यक्ष व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

राज्यातील सामाजिक ऐक्य कायम रहावे, यासाठी फडणवीस यांच्या भूमिकेनुसार उपसमिती काम करीत असून मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेवून गैरसमज दूर केले जातील. यासंदर्भात कोणताही दुराग्रह नसून उपसमितीने चर्चेची दारे खुली ठेवली आहेत, असे विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.




मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या उपोषण आंदोलनामुळे हैदराबाद गॅझेट स्वीकारून मराठा समाजातील नागरिकांना कुणबी दाखले देण्याबाबत शासननिर्णय जारी करण्यात आला होता. तो रद्द करावा, अशी मागणी भुजबळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. या शासननिर्णयावरुन ओबीसी समाज संतप्त आहे. या पार्श्वभूमीवर तो शासननिर्णय आणि जरांगे यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कशी करावी, यासंदर्भात उपसमितीची मंगळवारी बैठक झाली.

या बैठकीला मंत्री चंद्रकात पाटील मंत्री गिरीष महाजन मंत्री आशिष शेलार मंत्री माणिकराव कोकाटे मंत्री दादा भुसे मंत्री शिवेंद्रराजे भोसले मंत्री मकरंद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्याबाबत माहिती देताना विखे-पाटील म्हणाले, मराठवाडा आणि सातारा गॅझेटसंदर्भात झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली असून, दाखले देण्याबाबत तसेच नोंदणीची छाननी करण्याबाबत कशा पद्धतीने कार्यवाही करता येईल याचा आढावा घेण्यात आला.



मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सप्टेंबर अखेरीपर्यंत राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक सोमवारी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडून आढावा घेवून त्याचा प्रस्ताव समितीपुढे सादर करण्यात येईल. यासंदर्भात कालबद्ध अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आंदोलनामध्ये मृत पावलेल्या ९६ व्यक्तींना शासन मदत देण्याबाबत निर्णय झाला असून गेल्या दोन दिवसांत या रकमाही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. मृतांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असून राज्य परिवहन महामंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये नोकरी देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईमध्ये मराठा आंदोलकांच्या गाड्यांवर करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाई मागे घेण्यासंदर्भात सविस्तर अहवाल मागविण्यात आला असून या गाड्या नेमक्या कोणत्या होत्या, याची शहानिशा करुनच निर्णय घेतला जाईल, असे विखे-पाटील यांनी नमूद केले.

### मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेनुसार निर्णय

मराठा समाजासंदर्भात निर्णय घेताना शासनावर कोणाचाही दबाव नव्हता. उपसमितीने तीन-चार बैठका घेवून सर्व महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली व भूमिकेनुसार केले, असे विखे-पाटील यांनी भुजबळ यांनी घेतलेल्या आक्षेपांवर बोलताना स्पष्ट केले. मराठा समाजाप्रमाणेच ओबीसी समाजासाठीही मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली आहे. दोन्ही समित्यांचे अध्यक्ष आणि उप समित्यांच्या एकत्रित बैठका घेवून चर्चेतून मार्ग काढता येईल. उपसमितीने घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी सुरू झाली आहे, मात्र त्यासाठी काही कालावधी लागेल, हेही विचारात घेतले पाहिजे, असे विखे-पाटील यांनी नमूद केले.

## कुर्डू येथील बेकायदेशीर मुरूम उत्खननाबाबत खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतली केंद्रीय सचिवांची भेट

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील माढा तालुक्यातील कुर्डू येथील वनविभागाच्या जमिनीवर सुरू असलेल्या बेकायदेशीर मुरूम उत्खननाच्या गंभीर समस्येबाबत केंद्रीय वन विभागाचे सचिव तन्मय कुमार यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली.



कुर्डू येथील वनजमिनीतून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर मुरूम उत्खनन सुरू आहे. याला आळा घालण्यासाठी रेंज फॉरेस्ट अधिकाऱ्यांनी वारंवार प्रयत्न केले, परंतु कुर्डूवाडी पोलिस ठाण्याकडून याप्रकरणी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. वनरक्षक मोडनींब यांनी याबाबत सोलापूर ग्रामीणचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांना लेखी विनंती करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय सचिव तन्मय कुमार यांच्याकडे बेकायदेशीर उत्खनन रोखण्यासाठी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत राज्य सरकारला निर्देश देण्याची मागणीही त्यांनी केली.

## आयुक्तांचा स्वच्छता आढावा, रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'माझं सोलापूर - स्वच्छ सोलापूर, सुंदर सोलापूर' या मोहिमेच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील विविध भागात प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, सह. आयुक्त शशिकांत भोसले, सह. आयुक्त मनीषा मगर,अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, विभागीय अधिकारी उपस्थिती होते.



कोनापुरे चाळ, मोदी, लष्कर, नळ बाजार, लोधी गल्ली, सिद्धार्थ चौक,पाथरूड चौक, अशोक चौक, बापूजी नगर अशा परिसरांना भेट देऊन त्यांनी घरोघरी घंटागाडी जाते का, कचरा संकलन नियमित होते का याची पाहणी केली.तसेच अरुंद बोळामध्ये गाडी जात असल्यास त्या ठिकाणी कचरा मक्तेदाराने कर्मचारी नियुक्ती करून कचरा संकलन करावे असे आदेश दिले आहेत. यावेळी फुटपाथवर वाढलेले गवत व काही ठिकाणीरस्ता दुभाजक मधील अनावश्यक वाढलेले गवत व कचरा काढून घेण्याबाबत सुचना दिले.

या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच ज्या ठिकाणी घंटागाडी असूनही कचरा टाकला जातो, तेथे संबंधित आरोग्य निरीक्षक व सफाई कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचेही निर्देश दिले.

नागरिकांना आवाहन

महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कचरा रस्त्यावर किंवा फुटपाथवर टाकू नये. घरगुती कचरा फक्त घंटागाडीमध्येच द्यावा.

दुबाजक व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवावीत.

'आपलं शहर - आपली जबाबदारी, स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर' हा संदेश प्रत्येकाने आचरणात आणावा, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आवाहन केले आहे.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## सोलापुरातील दोन उड्डाणपुलांसाठी हवी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील संभाव्य दोन उड्डाण पुलांसाठी केंद्र सरकारच्या मालकीच्या काही जागांचे संपादन करावे लागणार आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी बोलणे झाले असून स्थानिक लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा गरजेचा असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.



उड्डाणपुलांसाठी एप्रिल महिन्यात 966.24 कोटींच्या निधीला मंजुरी दिल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी 'एक्स'वरून दिली आहे. केंद्रीय समितीमध्ये सोलापूरच्या या सुधारित प्रस्तावास अंतिम मान्यता मिळाली. मे अखेर भूसंपादनाचे काम पूर्ण करून नवीन निविदा काढली जाणार होती. परंतु केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीअभावी हा विषय रखडल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

## अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करणाऱ्यास 25 हजारांचे बक्षिस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने मोटार वाहनांच्या जीवघेण्या अपघातात अपघातग्रस्त झालेल्या व्यक्तीस तात्काळ मदत करणाऱ्या आणि अपघातग्रस्तांना अपघाताच्या गोल्डन अव्हरमध्ये हॉस्पिटल्स ट्रॉमा केअर सेंटरमध्ये वैद्यकीय उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या व्यक्तीस राह-वीर म्हणून पुरस्कार देण्याची घोषणा जाहीर केलेली आहे.

शासनाची राह-वीर योजना



रस्त्यावरील मोटार अपघातातील अपघातग्रस्तांना आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्याकरिता सामान्य जनतेस प्रवृत्त करणे व निष्पाप जीव वाचविण्यासाठी इतरांना प्रेरणा देणे प्रेरित करण्याच्या उद्देशाने राह-वीर योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेद्वारे राह-वीर यास 25000 रुपये इतकी पुरस्कार रक्कम रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने नवी दिल्ली यांनी निश्चीत केलेली आहे.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली असून. या योजनेबाबत रोजी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेण्यात आली. जिल्हास्तरीय समितीकडून निवडण्यात आलेल्या राह-वीर व्यक्तीची निवड करण्यात येणार आहे. या समितीकडून मंजूर झालेले प्रस्ताव परिवहन आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहेत. अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांनी दिली आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार


नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन भारताचे नवे उपराष्ट्रपती

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन हे विजयी झाले आहेत. त्यामुळे ते आता भारताचे १७ वे उपराष्ट्रपती ठरले आहेत.

त्यांनी विरोधकांच्या इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन यांना पराभूत केलं आहे. उपराष्ट्रपती पदासाठी आज(मंगळवार) मतदान प्रक्रिया पार पडली. सी.पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीचे ४५२ मतं मिळाली. तर बी. सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची ३०० मतं मिळाली.

भारतीय संसदेत लोकसभा आणि राज्यसभेसह एकूण ७८८ खासदार आहेत. सध्या दोन्ही सभागृहात ७ जागा रिक्त आहेत. अशाप्रकारे, एकूण ७८१ खासदारांना मतदान करायचे होते, त्यापैकी १३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. यामध्ये बीआरएसचे



४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि १ अपक्ष खासदाराने मतदान केले नाही. तर ४२७ एनडीए खासदारांनी मतदान केले. या निवडणुकीत एकूण ७६८ खासदारांकडून मतदान झाले.

उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी मतदान मंगळवारी सकाळी १० वाजता सुरू झाले आणि संध्याकाळी ५ वाजता संपले. मतदान संपल्यानंतर, काँग्रेसने सांगितले होते की उपराष्ट्रपती निवडणुकीत विरोधी पक्षात एकजूट राहिली. सर्व ३१५ खासदारांनी मतदान केले आहे. परंतु निकाल जाहीर झाल्यानंतर १५ मतं फुटल्याचे समोर आले आहे.

फेब्रुवारी २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत त्यांनी झारखंडचे राज्यपाल म्हणून काम पाहिले, तसेच मार्च ते जुलै २०२४ दरम्यान तेलंगाना आणि मार्च ते ऑगस्ट २०२४ दरम्यान पुदुच्चेरीच्या उपराज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला. ३१ जुलै २०२४ पासून ते महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत.

## शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे थकविणाऱ्या राज्यातील २८ साखर कारखान्यांवर आरआरसी कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे थकविणाऱ्या राज्यातील २८ साखर कारखान्यांवर साखर आयुक्तांनी आरआरसी कारवाई केली असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील तब्बल १५ साखर कारखानदार आहेत.

एक महिन्यावर साखर हंगाम येऊन ठेपला असताना आजही मागील हंगामातील राज्यातील ५४ कारखानदारांनी शेतकऱ्यांना ३०४ कोटींना लटकावले आहे.

बोटावर मोजण्याइतकेच साखर कारखाने उसाला चांगला दर देतात व उसाचे पैसे शेतकऱ्यांना वेळेवर देतात. इतर बहुतेक साखर कारखानदार शेतकऱ्यांचा ऊस वेळेवर व वेळेआधी तोडणी करतात. मात्र, तोडणी केलेल्या उसाचे पैसे देत नाहीत. शेतकरी साखर कारखानदारांच्या दारात, साखर कारखान्यांवर तसेच अधिकाऱ्यांकडे चकरा मारतात. मात्र, साखर कारखानदारांना वेदना होत नाहीत.

शेतकऱ्यांच्या हातात त्रागा करण्यापलीकडे काहीच नाही. मागील हंगामात गाळप घेतलेल्या दोनशेपैकी ५४ साखर कारखानदारांनी एफआरपीप्रमाणे ३०४ कोटी रुपये अद्यापही दिले नाहीत.

केवळ मागील हंगामात एफआरपी न देणाऱ्या राज्यातील २८ साखर कारखान्यांची साखर आयुक्तांनी आरआरसी केली आहे. या अठ्ठावीसमध्ये सोलापूर जिल्ह्यातील १५ व सोलापूर प्रादेशिक (पान 2 वर..)

## राज्यातील दीड लाख शिक्षकांचा थांबणार पगार!

### वेतन अधीक्षकांचे शाळांना आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीतील बोगसगिरी शोधण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने नोव्हेंबर २०१२ ते ऑगस्ट २०२५ पर्यंत मान्यता मिळालेल्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील १० हजार कर्मचाऱ्यांसह राज्यभरातील दीड लाख शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे अजूनही अपलोड झालेली नाहीत. मुदतीत कागदपत्रे अपलोड न करणाऱ्यांचा पुढील महिन्याचा पगार थांबविला जाणार असून, तसे आदेश वेतन अधीक्षकांनी काढले आहेत.

नागपूर जिल्ह्यात शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट वैयक्तिक मान्यता घेऊन काही शिक्षकांनी बोगस शालार्थ आयडी प्राप्त करून शासनाचा कोट्यवधींचा पगार लाटल्याची बाब समोर आली. त्यानंतर राज्यभरात असा प्रकार झाल्याचा संशय व्यक्त करीत शालेय शिक्षण (पान 2 वर..)

## संपादकीय

# 50 टक्के आरक्षणचा पुनर्विचार!

प्रा. अविनाश कोल्हेसध्या आरक्षण हा विषय चर्चेत आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने 1992 सालच्या इंद्रा साहनी खटल्यात घालून दिलेल्या कमाल 50 टक्क्यांच्या मर्यादेचा पुनर्विचार करणे गरजेचे झाले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे एक वेगळी पण या विषयाशी संबंधित बाब पुन्हा चर्चेत आली आहे आणि ती म्हणजे आपल्या देशात आरक्षणाच्या संदर्भात असलेली 50 टक्क्यांची कमाल मर्यादा. आज आपल्या देशात 49.5 टक्के आरक्षण दिलेले आहे. आज आरक्षणाच्या मुद्द्यात स्पर्धात्मक राजकारण शिरले आहे. यावर्षी बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. त्याचे वातावरण आताच तापायला लागले आहे.

बिहारमधील राष्ट्रीय जनता दल या पक्षाचे आजचे नेते तेजस्वी यादव यांनी अलीकडेच घोषणा केली की, जर त्यांचा पक्ष सत्तेत आला तर ते राज्यात 85 टक्के आरक्षण देतील. ही चर्चा अधिक व्यापक पातळीवर न्यायची असेल तर अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिलेल्या नोटीसचासुद्धा उल्लेख करावा लागतो. या नोटीसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीत 'क्रेमिलेयर' का लावू नये, अशी विचारणा केली आहे. क्रेमिलेयर हा प्रकार ओबीसीत सुरुवातीपासूनच म्हणजे 1993 सालापासून आहे.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदी आधी समजून घ्याव्या लागतील. आपल्या घटनेतील कलम 15 आणि 16 मध्ये भारतीय नागरिकांना समानतेचा हक्क दिला आहे. त्याचबरोबर सरकारला अनुसूचित जाती, जमातींच्या विकासासाठी खास कार्यक्रम राबवण्याचे अधिकारसुद्धा दिले आहेत. याचा आधार घेऊनच सरकार अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना सरकारी नोकर्‍या आणि शैक्षणिक संस्थांत आरक्षण देते. आता यात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी 10 टक्के आरक्षण वाढले आहे. 'आर्थिकदृष्ट्या मागासलेले' याबद्दल भारतात अनेक वर्षांपासून वादावादी सुरू आहे. मात्र, 2022 साली सर्वोच्च न्यायालयाने 'जनहित अभियान' खटल्यात पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने निर्णयानुसार 50 टक्के आरक्षणाची मयार्दा अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींसाठी आहे. 'आर्थिकदृष्ट्या मागासलेले' हा पूर्णपणे वेगळा वर्ग आहे, असे म्हणत ते दहा टक्के आरक्षण ग्राह्य धरण्यात आले. याचा अर्थ असा की आजघटकेला आपल्या देशात 49.5 टक्के अधिक 10 टक्के असे एकूण 59.5 टक्के आरक्षण आहे. 1990च्या दशकापासून अनेक सामाजिक घटक आरक्षणाची मागणी करत असल्यामुळे आणि एवढेच नव्हे तर त्यासाठी प्रसंगी आंदोलने करत असल्यामुळे आता 50 टक्क्यांबाबत पुनर्विचार करणे निकडीचे झाले आहे.

याचे कारण अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी या तीन गटांबाहेर असलेल्या जात समूहांना आरक्षणाची निकड भासायला लागली आहे. म्हणूनच 1990 नंतर जातनिहाय जनगणनेची मागणीसुद्धा व्हायला लागली होती. ही मागणी आता मान्य झाली आहे. एकदा जातनिहाय माहिती समोर आली की मग आरक्षणाचा फायदा कोणाला किती मिळाला आहे यावर प्रकाश पडेल. सरकारने ऑक्टोबर 2017 मध्ये न्या. जी. रोहिणी आयोग गठीत केला. या आयोगाने ओबीसीत उपवर्गीकरण कसे करता येईल, याबद्दल मार्गदर्शन करावे असे अपेक्षित आहे.

या आयोगाने केंद्रीय यादीत समाविष्ट असलेल्या ओबीसींच्या विस्तृत श्रेणीमध्ये सूचिबद्ध असलेल्या जातींमध्ये आरक्षणाच्या लाभांच्या असमान वाटपाच्या व्याप्तीचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. तसेच ओबीसींमधील उपवर्गीकरणासाठी शास्त्रीय दृष्टिकोनातून निकष तयार करणे आणि यंत्रणा बनवणे. या आयोगात एकूण चार सदस्य आहेत. अध्यक्षपदी दिल्ली उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती जी. रोहिणी आहेत. इतर तीन सदस्यांमध्ये एक सदस्य आहेत डॉ. जे. के. बजाज. हे गृहस्थ नवी दिल्लीतील 'सेंटर फॉर पॉलिसी स्टडीज'चे संचालक आहेत.

दुसरे सदस्य पदसिद्ध आहे. हे पद कोलकोता येथील 'अँथ्रोपोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'चे संचालक यांच्याकडे जाते. तिसरे पदसुद्धा पदसिद्ध आहे. हे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांच्याकडे जाते. स्वतः न्यायमूर्ती रोहिणी ओबीसी समाजाचे आहेत. या आयोगाचा अहवाल ऑगस्ट 2023 मध्ये सरकारला सादर केलेला आहे. पण सरकारने हा अहवाल अद्याप जाहीर केलेला नाही. मात्र, समोर आलेल्या काही बाबी लक्षात घेतल्या पाहिजे. आयोगाने दाखवून दिले आहे ओबीसींसाठी शैक्षणिक संस्थांत असलेल्या एकूण जागांपैकी आणि एकूण सरकारी नोर्कर्‍यांपैकी तब्बल 97 टक्के फायदा ओबीसींत 25 टक्के जातींनी मिळवल्या तर 75 टक्क्यांना काहीही मिळाले नाही. एवढेच नव्हे तर ओबीसींतील 2600 उपजातींपैकी सुमारे 1000 जातींना काहीही फायदा झालेला नाही. हा विचित्र प्रकारचा अन्याय आहे.

2024 साली 'स्टेट ऑफ पंजाब वि. दरविंदर सिंग' या खटल्यात सात न्यायमूर्तींचे खंडपीठ बसले होते. यातील चार न्यायमूर्तींनी केंद्र सरकारला अनुसूचितजाती आणि जमातींतसुद्धा क्रिमिलेयर असावं या दिशेने विचार करावा, अशी स्पष्ट सूचना केली होती. मात्र ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या सूचनेचा विचार करायचा नाही आणि जाती–जमातीत क्रिमिलेयर आणायचा नाही, असा निर्णय झाला.

आज जरी केंद्र सरकार या सूचनेचा विचार करण्याच्या मनःस्थितीत नसले तरी आज ना उद्या ही सूचना विचारात घ्यावी लागेल. सामाजिक न्यायासाठी आपण स्वखुशीने आरक्षणाचे तत्त्व स्वीकारलेले आहे. अशा स्थितीत आता या धोरणाची अंमलबजावणी कशी होत आहे, या अंमलबजावणीत काही त्रुटी निर्माण झाल्या आहेत का, त्या त्रुटी कशा दूर करायच्या इत्यादी बाबींचा विचार झाला पाहिजे.

## शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे थकविणाऱ्या...

विभागातील धाराशिव जिल्ह्यातील एका साखर कारखान्यांचा समावेश आहे.

**जिल्ह्यात आजही ४२ कोटी थकीत..**

» सोलापूर जिल्ह्यातील आठ साखर कारखान्यांकडे एफआरपीप्रमाणे ४२ कोटी १६ लाख रुपये थकले आहेत.
» सिद्धेश्वर सोलापूर सर्वाधिक १८ कोटी तर भीमा सहकारी टाकळी सिकंदर, गोकुळ शुगर, जयहिंद शुगर आचेगाव, सहकार शिरोमणी वसंतराव काळे, मातोश्री लक्ष्मी शुगर, इंद्रेश्वर शुगर, सिद्धनाथ शुगर तिर्हे या आठ साखर कारखान्यांकडे ऑगस्ट अखेरपर्यंत ४२ कोटी १६ लाख रुपये थकबाकी आहे. धाराशिव जिल्ह्यातील एकही कारखाना थकीत नाही.

**प्रबोधन**

# भक्तीचा रोग

देवभक्त हे समाजात आदर प्राप्त करीत असतात. त्यांच्याकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन चांगला असतो. देवभक्ताला लोक मान देतात. समाजस्वास्थ्याचा विचार करणारे त्याच्याविषयी आस्थावान असतात. सामाजिकदृष्ट्या तो एक निरुपद्रवी घटक आहे, असं ते मानतात.

देवभक्तांच्या जमेची बाजू आपण वर पाहिली. पण ती खरोखर जमेची बाजू आहे की खर्चाची (तोट्याची), याचा विचार होणे आवश्यक आहे. देवभक्तीमध्ये समाजाची फार मोठी लोकसंख्या समाविष्ट असल्यामुळे हा जमाखर्च तपासणे, हा राष्ट्रीय विचार होण्याइतका महत्त्वाचा झाला आहे. भक्तांची श्रमशक्ती आणि धनशक्ती यांचा हा अपव्यय टाळणे फार आवश्यक आहे. पण लक्षात कोण घेतो अशी आज आपल्या समाजाची स्थिती झाली आहे. शिवाय खुनशी राष्ट्रं जशी आपल्या पदरी जैविक शस्त्र बाळगतात त्याप्रमाणे आपल्या देशात तेवढंच भयंकर असं देव–धर्म–अध्यात्मशस्त्र बाळगणारे व त्याचा व्यापक प्रसार करणारे दुष्ट लोक संघ करून वावरताहेत. हे धार्मिक प्रदूषण देशाला सतत वेढून राहावं व लोक त्यातच बधिरावस्थेत असावेत, यासाठी प्रयत्नशील असणारी कार्यव्यवस्था चिकित्सकाला दिसून येते. या प्रदूषण व्यवस्थेचे बुवा, महाराज, बापू, माताजी, दीदीजी–बहेनजी ही साधनं आहेत. ह्या मंडळींनी, वास्तवाकडे डोळेझाक करून वेळ आणि मानवीशक्तीची नासाडी करणाऱ्या देवभक्तांच्या उत्पादनाचे जणू कारखानेच उघडले आहेत.

समाजहिताचा विचार करणारे, देवभक्तांच्या या वाढत्या संख्येने चिंतित झाले आहेत. पूर्वी वृद्धांना लागणारा हा देवभक्तीचा छंद अलीकडे तरुणांनाही भुलवू लागला आहे. कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात व्यक्तीच्या अस्तित्वाला आव्हान देणारे आर्थिक अनिश्चितता, असुरक्षितता, मानसिक व शारीरिक दौर्बल्य, अचूक मार्गदर्शनाचा अभाव, आशा–निराशेच्या प्रत्यही बसणाऱ्या थपडा, आपल्या कळपात युवकांना ओढू पाहाणारे राजकीय व धार्मिक टगे, प्रसारमाध्यमांनी पुरातन संस्कृतीचा मेंदूवर सतत थापलेला मागासलेपणा, कुटुंबप्रमुखांची नवी पिढी घडवण्यातील असमर्थता आदि बाबी तरुणांना दैववादी बनवण्यास कारणीभूत ठरत आहेत. हे सर्व चिंताजनक आहे. कारण थकलेल्यांना भविष्यकाळ नसतो. पण ज्यांच्या खांद्यावर भविष्यकाळ असतो, ते तरुण भक्तिमार्गाकडे वळले तर देशाचं भवितव्य काळवंडून जायला वेळ लागत नाही. तरुणांचं व प्रौढांचं या दृष्टीने प्रबोधन होणं फार फार आवश्यक आहे. कारण–

देवा दैवावरी । विसंबूनी जगे।
त्यास भीक लागे । निश्चयेशी ॥ १
समर्थ न कोण्या । आश्रयास जाई ।।
श्रमाची कमाई । सुखे भोगी ॥ २
गचाळांनी खूळ । घेतले भक्तीचे।
वाटोळे जन्माचे। त्यांचे झाले ॥ ३
त्यांचा धरा कान । पाजा थोडे ज्ञान
घालवा अज्ञान । बिचाऱ्यांचे ॥ ४

अध्यात्म आणि ऐहिकता यांचं कधीच जमत नाही. खरं तर, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष (स्वातंत्र्य) हे चारही पुरुषार्थ आध्यात्मिकाला, देव–दैववाद्याला कधीच प्राप्त होत नाहीत. कारण तो अकार्यक्षम, आळशी व परावलंबी असतो. धर्म (कर्तव्यपूर्ती), पैसा, उपभोग आणि सर्वप्रकारचं स्वातंत्र्य (मोक्ष) ज्याची दृष्टी ऐहिकयुक्त, इहवादी आहे त्यालाच प्राप्त होतात. 'दे हरी पलंगावरी' म्हणणाऱ्याचा पलंगसुद्धा हरी काढून नेतो. म्हणून परावलंबित्वाचा महारोग बरा करायचा असेल, देशातील सर्व नागरिक आपल्या हक्काचं जीवन प्राप्त करण्यासाठी संघर्षशील बनवायचे असतील, तर देव–दैववादाचे विषाणू आत्मभानाचं आणि वास्तवाचं भान देऊन मारून टाकावे लागतील. देवाला सतत जे हात जोडतात, ते आपल्या भाग्योदयाला कायमचा रामराम ठोकतात!

रिकामे राहती । हात जोडलेले ॥
डोळे मिटलेले । तमलक्षी ॥१
गुंती अध्यात्माच्या। गुंतलेले मन ।
करी नुकसान । भौतिकाचे ॥२
हात कामामध्ये । नजर चौफेर ।
तोच खरा वीर। जीवनाचा ॥३
समाजाचा वेध । मन घेई सदा ।
गतीचा कायदा। कळे ज्यास ॥४
जन्मा येऊनिया । सार्थक जाहले ।
आयुष्यास केले । त्याने धन्य ॥५
हात जोडूनिया। जगू नका कधी ।
आयुष्याची संधी। पुन्हा नाही ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

**प्रबोधन**

# मागासला देश । पुढारली भक्ती

मानवतावादी विचारवंत हट्टी, एककल्ली, ईश्वरवाद्यांला मानवतावादाचं माहात्म्य त्यांच्या शब्दांत समजावून देताना 'Service to man is service to God' असा विचार व्यक्त करतात. हा विचार पुरोगामी आहे; यात वादच नाही. पण ईश्वरवादी जर थंड डोक्याने विचार करणारे आहेत असं दिसलं, तर वरील वाक्याला जोडून असंही म्हणावं, 'But service to God is service to nonsense.' म्हणजे त्यांच्या डोक्यात लख्खं प्रकाश पडेल, शिवाय एक पूर्ण अथार्च वाक्य बोलण्याचं श्रेयही आपणाला लाभेल.

साने गुरुजी म्हणूनच म्हणतात, 'आपण झाडामाडांत देव पाहातो. दगडधोंड्यांत देव पाहातो. भुताप्रेतांत पाहातो. परंतु मानवातील देव आपणास दिसत नाही. आपणास चार तोंडांचा, आठ हातांचा असा देव पाहिजे असतो. मनुष्याच्या रूपाने आपल्या शेजारी उभा असलेला परमेश्वर आपणास दिसत नाही.' समाजशिक्षक तुकोबांनीसुद्धा जन तेचि जनार्दन हे तत्त्व समाजमनावर ठसवण्याचा प्रयत्न करताना ऐसे भाग्य कई लाहता होईन। अवघे देखे जन ब्रह्मरूप– अर्थात, 'प्रत्येक व्यक्ती देव आहे, असं जेव्हा मला वाटेल, तेव्हाच मी खरा भाग्यवान होईन, ' असं म्हटलंय.

महात्मा चक्रधरसुद्धा मानवतेचे उपासकच होते. एकदा नागदेवाचार्य कुणाला तरी टाकून बोलल्याचे शब्द त्यांच्या कानावर पडले. तेव्हा चक्रधरांनी त्यांना आपल्या जवळ येण्यास मज्जाव केला. ते शिष्यांना म्हणाले, 'हा एका जीवाचे चैतन्य पोळून आला, त्यास हाकला बाहेरी.' अध्यात्म मार्गाचे मार्गदर्शक म्हणून चक्रधरांचा गौरव त्यांचे भक्त करत असले, तरी चक्रधरांचा आराध्य माणूसच होता. समाजनिष्ठा हीच त्यांची भक्ती होती. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'भक्तासाठी आवश्यक असलेल्या उपासनेचा सर्वोच्च प्रकार म्हणजे मानवपूजा होय. खरोखर पूजा करावयाची असेल तर परिस्थितीनुसार शक्य तितक्या गरिबांना आपल्या घरी बोलावून त्यांना ईश्वररूप मानून त्यांची सेवा केल्यास ते सर्वोत्तम होय.' तात्पर्य, जनसेवा हीच ईशसेवा! ईशसेवा ती जनसेवा नव्हे!

वैष्णव संप्रदायाचे नरसी मेहता म्हणत, वैष्णवजन तो तेणे कहिये जे पीड पराई जाने रे। अर्थात, दुसऱ्याचे दुःख जाणतो तोच वैष्णव ! त्यांची ही दृष्टी शुद्ध भौतिक होती; ऐहिक होती आणि आध्यात्मिक नव्हे, सामाजिक होती. त्यांचा वैष्णव कोणाची निंदा न करणारा, दिलेलं वचन पाळणारा, परोपकारी, नम्र, निरहंकारी, सरळमार्गी सज्जन होता. महात्मा गांधींजी नरसी मेहताच्या त्या अभंगाचे सामूहिक गायन करीत. यामागे धार्मिकांनी खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे हा मंत्र हृदयाशी धरून आपली आकाशावर खिळलेली नजर आपल्या आजूबाजूला पसरलेल्या जनलोकावर स्थिर केली पाहिजे, असाही हेतू होता. तर अधार्मिकांनी मानवहिताच्या कामी श्रद्धावान, आस्थावान झालं पाहिजे. कारण मानवाच्या सुखात वृद्धी होणं हा धार्मिकांचा मोक्ष तर अधार्मिकांचं सार्थक असलं पाहिजे, हा विचार त्यामागे होता. चावार्कांनी, गौतम बुद्ध, महावीर, बसवेश्वर, कबीर, चक्रधर, ज्ञानदेव, तुकाराम, गांधीजी ... या साऱ्याच थोरांनी मानवकल्याण हाच मोक्ष, तोच स्वर्ग, तेच साफल्य मानलेलं आहे.

कृतिशील विचारवंत भाई माधवराव बागल लिहितात, 'नास्तिकवाद या शब्दाला लोक निष्कारण भितात. पण तोच मानवाच्या कल्याणाचा मार्ग आहे. मानवजातीला समानतेच्या पातळीवर आणणारा तो मार्ग आहे. तो सर्वांना प्रेमाच्या धाग्यात गोवणारा आहे. नास्तिकवादी तत्त्वज्ञान हेच अतिप्रगत तत्त्वज्ञान आहे.' आज इहवाद आणि विश्वकु टुंबवाद नास्तिकवादाच्याच आश्रयाने वृद्धिंगत होत आहेत. देव आणि धर्म यांना भविष्यकाळाच्या बुद्धिप्रधान युगात स्थान नसणार, हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ सत्य आहे. देवाचं–ईश्वराचं बुजगावणं तेव्हा अडगळीत पडलेलं असेल, हे ओळखून लक्षात ठेवा–

धूर्त लबाडांनी । लाविले पूजनी ।
पूजिले भक्तांनी । खोट्या देवा ॥१
सापडे भाविक । लबाडांच्या हाती ।
बरबाद होती । वेडे भक्त ॥ २
भक्तांना न उरे । समाजाचे भान
सदा त्याचे ध्यान। देव–धर्मी ॥ ३
देश मागासला । हे न कळे त्यास
खुंटला विकास। देशाचाही ॥४
देशोन्नती आणि । समाजकल्याण
राही दुर्लक्षून । मागासले ॥५
मागासला देश। पुढारली भक्ती
कासवाची गती । चाले देश ॥ ६
नागडे, उपाशी असणारे भक्त
कसे देशहित । साधणार? ॥ ७ ॥
भक्तीच्या ऊर्जेचे। करा नियंत्रण
देशाचे कल्याण । होण्यासाठी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना – ग्रामीण उद्योजकतेला चालना

भारत सरकारने ग्रामीण भागातील असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) सुरू केली आहे. ही योजना २०२०–२१ पासून सुरू आहे.

**योजनेचा उद्देश :**

- असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देणे
- उत्पादनात गुणवत्ता आणि मूल्यवर्धन करणे
- अन्न सुरक्षा मानकांचे पालन सुनिश्चित करणे
- ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे
- शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे

**आर्थिक सहाय्य :**

- वैयक्तिक उद्योजकांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ३५% पर्यंत अनुदान, जास्तीत जास्त ₹१० लाख
- SHGs, FPOs, सहकारी संस्था यांना मूल्य साखळीतील अन्नप्रक्रिया यंत्रणा उभारण्यासाठी अनुदान
- सामायिक पायाभूत सुविधा जसे की प्रक्रिया केंद्र, शीतगृह, गोदाम यासाठीही अनुदान
- पत संलग्न भांडवली अनुदानः प्रकल्प खर्चाच्या ३५% पर्यंत, जास्तीत जास्त ₹३ कोटी (प्रकल्प खर्च ₹१० कोटीपेक्षा जास्त नसावा)

**ब्रँडिंग आणि मार्केटिंगसाठी सहाय्य :**

- उत्पादनाच्या ब्रँडिंग व विपणनासाठी एकूण खर्चाच्या ५०% पर्यंत अनुदान
- पॅकेजिंग, मानकीकरण, गुणवत्ता नियंत्रणासाठी मदत
- प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ₹५ लाखांपर्यंत सहाय्य

**अन्य सुविधा :**

- उद्योजकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकास
- तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन
- बँक कर्ज जोडणीसाठी सहाय्य

**योजनेसाठी पात्रता :**

- असंघटित अन्नप्रक्रिया उद्योग
- वैयक्तिक सूक्ष्म उद्योजक
- स्वयं–सहायता गट (SHGs)
- शेतकरी उत्पादक गट (FPOs)
- सहकारी संस्था व उत्पादक सहकारी संस्था

**योजनेअंतर्गत समाविष्ट उद्योग :**

- फळे व भाजीपाला प्रक्रिया
- धान्य व कडधान्ये प्रक्रिया
- दुग्ध प्रक्रिया
- मांस व कुक्कुटपालन प्रक्रिया
- मत्स्य प्रक्रिया
- तेलबिया प्रक्रिया
- पेय व मसाले प्रक्रिया

**आवश्यक कागदपत्रे :**

- आधार कार्ड, पॅन कार्ड
- बँक खाते तपशील
- व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास)
- प्रकल्प अहवाल
- जमीन/भाडेकरार दस्तऐवज
- भागीदारी करार किंवा संस्था नोंदणी (लागू असल्यास)

**अर्ज प्रक्रिया :**

इच्छुक उद्योजकांनी आपल्या जिल्हा किंवा तालुका स्तरावरील कृषी विभागाशी संपर्क साधावा किंवा अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावा. अर्ज प्रक्रिया संबंधित अन्नप्रक्रिया विभागामार्फत राबवली जाते.

PMFME योजना म्हणजे ग्रामीण भागातील अन्नप्रक्रिया उद्योगांना बळ देणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकरी, महिला गट, आणि स्थानिक उद्योजकांना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि बाजारपेठे पर्यंत पोहोच मिळते. स्वावलंबन आणि गुणवत्ता यांचा संगम साधणारी ही योजना ग्रामीण भारताच्या विकासासाठी एक मजबूत पायाभूत व्यवस्था निर्माण करत आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

**– सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी
सोलापूर

पान १ वरून

## राज्यातील दीड लाख शिक्षकांचा...

विभागाने सर्व शासकीय व खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे साडेचार लाख शिक्षक– शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कागदपत्रे अपलोड करण्याचे आदेश काढले.

सुरवातीला ३१ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती, ती मुदत आता १५ सप्टेंबरपर्यंत वाढविली आहे. त्यात प्रामुख्याने सर्व शिक्षक– शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेली वैयक्तिक मान्यता, संस्थेतील रुजू रिपोर्ट, नियुक्ती आदेश व उपसंचालकांचे शालार्थ आयडीचे आदेश जोडून ऑनलाइन अपलोड करावे लागणार आहेत. अनेक शिक्षकांची संस्था किंवा शाळा बदलल्याने त्यांना आता संस्थेकडून कागदपत्रे मिळत नसल्याची ओरड आहे. त्यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत.

**'टीईटी'च्या निर्णयावर शासन जाणार न्यायालयात**

२०१३ पासून राज्य सरकारने टीईटी उत्तीर्ण झालेल्यांनाच शिक्षक म्हणून नेमणुका दिल्या आहेत. पण, सर्वोच्च न्यायालयाने २०१२ पूर्वीच्या सर्व शिक्षकांसाठी देखील (ज्यांचे वय ५२ वर्षांपर्यंत आहे असे) टीईटी उत्तीर्णचे बंधन घातले आहे. त्यावर उत्तर प्रदेश सरकारने पुनर्विचार याचिका दाखल केली आहे. त्यावर १६ सप्टेंबरला सुनावणी होणार असून, त्यानंतर महाराष्ट्र शासन उच्च न्यायालयात भूमिका मांडणार आहे. त्यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक पार पडली आहे. १६ सप्टेंबरनंतर पुरेशी कागदपत्रे घेऊन शासन सर्वोच्च न्यायालयात धाव घेईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### आदेश सर्व मुख्याध्यापकांना दिले

सर्व खासगी अनुदानित शाळा, सरकारी शाळांमधील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता, रुजू अहवाल, नियुक्ती आदेश, शालार्थ आयडी अशी सर्व कागदपत्रे शासनाला अपलोड करायची आहेत. त्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, मुदतीत ज्यांची कागदपत्रे अपलोड होणार नाहीत, त्यांचा त्यापुढील पगार थांबविला जाणार आहे. तसे आदेश सर्व मुख्याध्यापकांना दिले आहेत.

**– दीपक मुंढे,** वेतन अधीक्षक, सोलापूर

# हैदराबाद गॅझेटप्रमाणे कोल्हापूर गॅझेटियरही तत्काळ लागू करा

## सकल मराठा समाज पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषदेत मागणी

**कोल्हापूर : (कटूसत्य वृत्त):–** कोल्हापूर जिल्ह्यातील मराठा– कुणबी बांधवांना न्याय मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेटप्रमाणे राज्य शासनाने कोल्हापूर गॅझेटियर तातडीने लागू करावे, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली.

कोल्हापूर जिल्ह्याच्या १८८१ च्या गॅझेटियरनुसार लोकसंख्या ८ लाख १८९ होती. त्यापैकी कुणबी लोकसंख्या २ लाख ९९ हजार ३५०, तर मराठा लोकसंख्या नोंदीप्रमाणे ६२ हजार २८७ होती. शेती करणारे, परंतु लढवय्ये कुणबी व शिपाईपणाचा बाणा बाळगणारे शूर मराठे व मराठी भाषा बोलणारे होते. मराठा व कुणबी यांच्यात फारसा भेद दिसत नाही. दोघांचे राहणीमान, स्वभाव, देवक, आहार, शेतीसह जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या रूढी–परंपरा यात इतके साम्य आहे की, मराठा–कुणबी या दोघांमध्ये रोटीबेटी व्यवहार (लग्न) होतात. त्यामुळे इतिहास संशोधकांच्या मते, मराठा आणि कुणबी हे



एकच आहेत, हे कोल्हापूर गॅझेटियरवरून सिद्ध होते, असे मुळीक म्हणाले.

कोल्हापूर जिल्ह्याची २०११ साली लोकसंख्या ३८ लाख होती, ती सध्या सुमारे ४२ ते ४३ लाख इतकी झाली आहे. यामध्ये जिल्हा मराठा कुणबीबहुल असल्याने मराठा, कुणबी लोकसंख्या सुमारे २० ते २१ लाख इतकी असणार आहे. परंतु २०११ पासून आतापर्यंत फक्त ६ हजार ७५० कुणबी दाखल्यांची जात पडताळणी होऊन प्रमाणपत्रे दिली आहेत. १८८२ मध्ये २ लाख ९९ हजार ३५० कुणबी लोकसंख्या होती. या हिशेबाने २०२५ पर्यंत १५ लाखांवर कुणबींची लोकसंख्या झाली असावी. परंतु, त्या प्रमाणात कुणबी दाखले मिळणे अपेक्षित असताना २०२१ पासून फक्त ६ हजार ७५० कुणबी दाखले दिले गेले आहेत, असे मुळीक म्हणाले.

कोल्हापूर संस्थानात १८८१ मध्ये १३ लाख कुणबी असताना आतापर्यंत १५ लाख कुणबींची संख्या झाली पाहिजे होती. परंतु, कुणबी दाखल्यांची अल्पसंख्या पाहता, लाखो कुणबी नोंदी कुठे गायब झाल्या आहेत, त्याचा सरकारने शोध घ्यावा, अशी मागणीदेखील समाजाने केली आहे.

**आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान कुणाचे?**

१८८१ मधील गॅझेटमध्ये मराठा–कुणबी एकच आहे, असे स्पष्ट असताना १९९६ च्या गॅझेटमध्ये मराठा आणि कुणबी वेगवेगळे दाखविण्याचे षड्यंत्र कोणी केले ? १८८१ च्या मूळ गॅझेटियरमध्ये १९९६ मध्ये फेरफार करून मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान कोणी केले? १९९४ मध्ये शंभरपेक्षा जास्त जाती ओबीसीमध्ये घालत असताना, कुणबी जातीला बाहेर का ठेवले, यांचे उत्तर मिळावे, अशी मागणी करण्यात आली.

**कुणबी दाखला मिळणे जिकिरीचे**

न्या. संदीप शिंदे समितीच्या कुणबी शोधमोहिमेत कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे १ लाख ५० हजार इतक्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत. परंतु, १९३२ नंतर सर्वसाधारण कुणब्यांनी मराठा नोंद केल्याने कुणबी दाखले मिळणे जिकिरीचे झाल्याचे सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले..

## वात्रटिका

### तिळपापड नि आगपाखड

भारताची प्रगती,भरारी
तिच्या डोळ्यात खुपते...
टेरिफ लावून नमत नाही
तेव्हा बसायची जागा दुखते...
किती चिडचिड आणि त्याचा
किती होतो तिळपापड...
ढुंकूनही नाही पाहिले तेव्हा
त्याची पुन्हा आगपाखड...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शेतकऱ्यांना कर्जासाठी अडवणूक झाल्यास खपवून घेणार नाही- आ. अभिजीत पाटील



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांनी पंढरपूर पंचायत समिती शेतकी सभागृह येथे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबाराचे अयोजन करण्यात आले होते.


तसेच तालुका कर्जवाटप समिती आढावा बैठक आ. अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी सर्व नॅशनल, सहकारी तसेच खासगी बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पीक कर्ज तसेच शिक्षण कर्ज, आण्णासाहेब पाटील, उमाजी नाईक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, संत रोहीदास अशा तब्बल १८ महामंडळांना कर्ज देण्यासाठी अडवणूक केल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, इथून पुढे शेतकऱ्यांना सिव्हिलची अट न घालता लवकरात लवकर सर्व कर्ज वाटप करण्यात यावे..

कायमच चर्चेत राहिलेले आ. अभिजीत पाटील यांनी तीन अधिवेशनामध्ये मतदारसंघातील अनेक समस्या विधिमंडळात मांडल्या आहेत. सर्वसामान्य जनतेची काम सुरळीतपणे व्हावी यासाठी जनता दरबाराचे आयोजन केले असून यातून हजारो शेतकऱ्यांचे प्रश्न समस्या सुटल्या आहेत यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे.

या जनता दरबारामध्ये पंढरपूर तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून आपापल्या समस्या, अडचणी व मागण्या मांडल्या. नागरिकांनी मांडलेल्या तक्रारी व निवेदनांचा तत्काळ निपटारा करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# महाबँक कर्मचारी संघटनेचा 'डॉ.श्रीपाद अमृत डांगे स्मृती पुरस्कार' कॉ.मिलिंद रानडे यांना जाहीर



**छ. संभाजी नगर (कटूसत्य वृत्त):-** बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन,औरंगाबाद या ए.आय.बी. इ.ए.(अक्बिएअ) संघटनेच्या वतीने कामगार चळवळीत अमूल्य योगदान दिलेल्या व्यक्तीस कामगार चळवळीचे अर्धव्यू कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांचे स्मरणार्थ 1999 सालापासून पुरस्कार दिला जातो.

या वर्षी छ. संभाजी नगर येथे संघटनेच्या संपन्न होत असलेल्या संघटनेच्या अधिवेशनात या पुरस्कारासाठी निवड समितीने मुंबई कचरा वाहतूक या अत्यंत दुर्लक्षित क्षेत्रातील कामगारांसाठी प्रदीर्घ कायदेशीर न्यायालयीन संघर्ष करून त्यांना सेवेत कायम करण्यात यशस्वी झाले अशा कॉ.मिलिंद रानडे यांची निवड केल्याची घोषणा संघटनेचे अध्यक्ष कॉ.देविदास तुळजापूरकर आणि जनरल सेक्रेटरी कॉ.धनंजय कुलकर्णी यांनी केली.

कचरा वाहतूक गाडीवरच घ्यावे लागणारे जेवण, प्रत्येक फेरीवरच ठरलेली मिळकत, पिण्यासाठी सुद्धा पाण्याची सोय नाही,कामाच्या ठिकाणी गमबुट किंवा हातमोजे पुरवठा नसल्याने निर्माण होणारे त्वचा आणि श्वसनाशी होणारे घातक दुर्धर आजार,कामाहून परतीच्या वेळी कपडे आणि शरीर यामुळे होणारी दुर्गंधी म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास नाही अशा यम यातना मधून जगावे लागणारे जीवन अशा कामगारांशी संवाद साधून,महत्प्रयासातून त्यांची संघटना बांधणे आणि तो सर्वोच्च न्यायालया पर्यंत वीस वर्षाहून चिवटपणे लढण्याचे कार्य कॉ. रानडे यांनी केले आहे.

बँक कर्मचारी संघटनेने या पुरस्काराची पार्श्वभूमी विषद करताना कॉ. तुळजापूरकर आणि कॉ. धनंजय कुलकर्णी म्हणाले की,समाजातील विविध क्षेत्रात कार्य केलेल्या व्यक्तींचा सन्मान अनेक ठिकाणी केले जातात परंतु कामगार क्षेत्रात आयुष्यभर काम करणाऱ्या व्यक्तीच्या कायाची दखल सहसा घेतली जात नाही. यामुळेच आमच्या बँक कर्मचारी संघटनेने असा पुरस्कार देऊन सन्मान करण्याचे ठरविले.

आजवर कॉ.चिटणीस, कॉ. उल्का महाजन, कॉ.सुरेश धोपेश्वरकर अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

या वर्षी संघटना अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात दि.13 सप्टेंबर रोजी हा पुरस्कार कॉ.रानडे यांना प्रदान करण्यात येईल. रोख रु 50,000/- आणि स्मृति चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल, हे ही त्यांनी स्पष्ट केले.

# 'शिवसंस्कार महोत्सव २०२५' चे उद्घाटन

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालातीत विचारांना समर्पित ऐतिहासिक सांस्कृतिक महोत्सव मुंबईत सुरू



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालन' या आगळ्या-वेगळ्या सांस्कृतिक उपक्रमाचे उद्घाटन आज महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री मा. आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न झाले.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा दुर्गांचा ऐतिहासिक समावेश झाल्यामुळे महाराष्ट्र संस्कृतीकडे जागतिक स्तरावर सर्वदूर अभिमानाने आणि औत्सुक्याने पाहिले जात आहे. रायगड, विजयदुर्ग, साल्हेर, शिवनेरी, लोहगड, जिंजी, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, खांदेरी, सुवर्णदुर्ग आणि सिंधुदुर्ग हे बारा दुर्ग ह्यमराठा मिलिटरी लँडस्केप्सह्व या संकल्पने अंतर्गत युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झाले आहेत.

या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील कालातीत मूल्ये भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, दि. ८ ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान विविध उपक्रमांसह मुंबईतील प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीमध्ये सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई यांनी "शिवसंस्कार महोत्सव २०२५" आयोजित केला होता. हा महोत्सव इतिहास, संस्कृती आणि प्रेरणेचा एक सुंदर संगम ठरला.

शिवसंस्कार महोत्सव केवळ इतिहासाचे सादरीकरण म्हणून नव्हे, तर आजच्या नागरिकांसाठी, तरुणांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी देशभक्ती, नेतृत्व, नीतिमत्ता, चारित्र्य आणि एकता या मूल्यांची आठवण करून देणारा एक जिवंत अनुभव असेल. सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई गेली १५ वर्ष हा अनमोल वारसा जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्य करीत आहे.

लेखक, गीतकार आणि या उपक्रमाचे सर्वेसर्वा अनिल नलावडे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन केवळ लढाया आणि विजयांपुरते मर्यादित नाही; त्यात दूरदृष्टी, नीतिमत्ता, नेतृत्वाचे आणि राष्ट्राप्रती आपल्या कर्तव्याचे अमूल्य धडे आहेत. शिवसंस्कार महोत्सवाद्वारे आम्हाला ही मूल्ये तरुण पिढीपर्यंत पोहोचवायची आहेत, जेणेकरून ते एक मजबूत आणि एकसंघ भारत घडविण्यास मोलाची भूमिका बजावतील.'

शिवसंस्कार महोत्सव २०२५ मध्ये मुंबईकरांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंना अनुभवण्याची संधी मिळाली. महोत्सवाची सुरुवात 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालनाने' झाली असून हे कलादालन दिनांक ७ ते १३ सप्टेंबरदरम्यान रोज सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या तळ मजल्यावरील आर्ट गॅलरीत आयोजित करण्यात आले होते. यात अनिल नलावडे यांनी अनेक वर्ष अभ्यास करून लिहिलेल्या व त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या १५० पेक्षा जास्त चित्रकाव्यरूप कलाकृतींचा समावेश होता. यातील काही व्यक्तिचित्र चित्रकार राम देशमुख यांच्याकडून तयार करून घेतली गेली होती, तर काही AI न्यूरल रेंडरिंगच्या माध्यमातून सईशा प्रोडक्शन्स, मुंबईने तयार केली होती.

"सईशा प्रोडक्शन्स मुंबई यांनी सर्व शाळा आणि महाविद्यालयांना आवाहन केलं आहे की त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसहित 'शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालनाला' नक्की भेट द्यावी. या प्रदर्शनातून त्यांना भारताचा समृद्ध इतिहास आणि राष्ट्रीय वारसा अनुभवता येईल."

कार्यक्रम संचालक, दिग्दर्शक व निवेदक पद्मश्री राव म्हणाल्या, 'हा महोत्सव म्हणजे छत्रपती शिवरायांना पुन्हा नव्याने जाणून घेण्याची संधी - फक्त एक शूर योद्धा म्हणून नव्हे, तर दूरदृष्टी असलेले राजकारणी आणि नैतिक शक्तीचा आधारस्तंभ म्हणूनही. कविता, गाणी आणि संवाद यांच्या माध्यमातून आम्ही इतिहास आणि आजचा काळ यांच्यातला संबंध अजून जवळ आणण्याचा प्रयत्न करत आहोत.'

दि. ८ ते १२ सप्टेंबर दरम्यान दररोज आयोजित होणाऱ्या 'युद्धापलीकडले शिवराय' या चर्चा मालिकेचा विशेष भाग असेल. या मालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूल्यांवर आणि नेतृत्वावर प्रकाश टाकण्यात येईल. पद्मश्री राव आणि अनिल नलावडे हे महाराजांच्या विविध पैलूंवर माहितीपर सत्र घेणार आहेत. या माहितीपर सत्रासाठी दररोज ५० मर्यादित आसने असणार आहेत.

या चर्चासत्रांत पुढील विषयांवर सखोल विचारमंथन केले जाईलः बालपणी आईवडिलांनी दिलेल्या संस्कारातून शिवराय काय शिकले ?, शिवरायांचे नेतृत्वगुण, युद्धनीती, रणनीती, दुर्गनीती, स्वराज्य आणि सुराज्य याचं महत्व, चारित्र्य आणि शीलवान व्यक्तिमत्त्व, शिवरायांचे व्यवस्थापनकौशल्य आणि माणसांमधली गुंतवणूक.

१४ सप्टेंबर रोजी 'शिवराय जगतांना' या कार्यक्रमात कविता, संवाद आणि अनप्लग्ड संगीत एकत्र आणून सह्याद्री, राजमाता जिजाऊ, किल्ले, दूरदृष्टी आणि स्वराज्य यांसारख्या विषयांचा शोध घेतला जाईल. तसेच, कला अकादमीच्या मिनी सभागृहात शिवचरित्रावर आधारित अनिल नलावडे यांनी लिहिलेल्या पाच नवीन गाण्यांचे प्रकाशन होईल. यात कलाकार श्रीरंग भावे, केतकी भावे जोशी, पद्मश्री राव आणि अनिल नलावडे सहभागी होतील.

महोत्सवाचा समारोप १४सप्टेंबर रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी पार्क, दादर येथे 'संगीत शिवस्वराज्यगाथा' या संगीतमय ऐतिहासिक कार्यक्रमाने होईल. ४३ नवीन रचनांद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी जीवन सादर करणाऱ्या या पुरस्कारविजेत्या संगीतमय कार्यक्रमात नचिकेत देसाई, श्रीरंग भावे, केतकी भावे जोशी, अनिल नलावडे आणि पद्मश्री राव सहभागी होतील. हा कार्यक्रम फक्त सशुल्क रू. १५०/- इतका असेल. याची तिकिटे बुकमायशो वर उपलब्ध आहेत. बाकी सर्व उपक्रम विनामूल्य आहेत.

हा महोत्सव फक्त कार्यक्रमांची मालिका नाही, तर विचार जागवणारा, प्रेरणा देणारा आणि समाजमनाला घडवणारा शिवसंस्कार आहे.

या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हा, शिवसंस्कारांची ऊर्जा स्वतः अनुभवा, सोबत इतरांना ही अनुभवण्यासाठी घेऊन या.. कारण 'शिवचरित्र हा राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया आहे.'

# मोहोळ शहरातील निघालेल्या ईद-ए-मिलाद निमित्त खाऊ वाटप




**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील निघालेल्या ईद-ए-मिलाद निमित्त जुलूस मध्ये मा.नगरसेवक मुस्ताक शेख (साहेब) यांच्या मार्गदर्शनाने सनराईज क्लबच्या वतीने केक, मस्का पाव, बिस्कीट, पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले. यावेळी साहिल शेख, हुजेफ शेख, अजीम तांबोळी, साकिब आतार, शाहीद शेख, शायद शेख, जावेद बागवान, साकिब शेख, अबीद शेख, जैद शेख, इंजमाम शिकलकर, हरिष शेख, अरबाज तांबोळी, साकिब शेख, सुफियान शिकलकर अमन हरणमारे, आयान तांबोळी, सत्तार शेख, शमशोद्दीन शेख, समीर शेख, अन्वर सय्यद सर्व सदस्य उपस्थित होते.

# रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट तर्फे पाच शिक्षकांचा गौरव




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट आयोजित शुक्रवार ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त आयोजित नेशन बिल्डर अवॉर्ड कार्यक्रमात सोलापुरातील पाच शिक्षकांना शाल, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्राध्यापिका डॉक्टर श्रुती वडगबाळकर या उपस्थित होत्या. श्री हणमंत अर्जुन पवार (कै श्रीपतराव सोनटक्के प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय तांदुळवाडी) निंगप्पा सोमनिंग व्हनमाने (श्री सोमेश्वर हायस्कूल दक्षिण सोलापूर) अश्विनी मोरे वाघमोडे (सेवासदन प्रशाला) योगीनाथ विनायक वाघोले (सिद्धेश्वर प्रशाला) सना आरिफ काखंडकीकर (सेंट जोसेफ प्रशाला) या सर्व शिक्षकांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.श्रुती वडकबाळकर यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा पाया भक्कम करणाऱ्या शिक्षकांना आजही एकविसाव्या शतकात समाजात अतिशय मानाचे स्थान आहे. कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी हे फारसे प्राध्यापकांच्या संपर्कात येत नाहीत. पण शाळेतील विद्यार्थी हे सतत शिक्षकांच्या अवती भवती असतात. या दिनाच्या औचित त्याने त्यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याचा परिचय करून दिला. पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी रोटरीप्रती. कृतज्ञता व्यक्त करून आम्ही यापुढेही असे उत्तमोत्तम कार्य करू अशी ग्वाही दिली.रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे डॉ. केदार कहाते व आदर्श गोयदानी यांना डिस्ट्रिक्ट क्लब कडून पुरस्कार मिळाल्या बद्दल क्लबच्या वतीने पण सत्कार केला व क्लब मधील शिक्षकांचा पण सत्कार केला.

या कार्यक्रमासाठी रोटरी ई क्लबचे अध्यक्ष रोटे. बालमुकुंद राठी व सचिव रोटे रोशन भुतडा यांच्यासह सर्व पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

# बार्शी तालुक्यातील 8 गावाची मोजणी कार्यवाही होईपर्यंत कलम 163 लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग करिता भूसंपादन प्रक्रिया आंदोलन पार्श्वभूमीवर बार्शी तालुक्यातील 8 गावाचे (गौडगांव, मालेगांव, आंबेगांव, आंबाबाईचीवाडी, जवळगांव, हत्तीज, चिंचखोपन व शेळगांव (आर)) वेळापत्रक प्रमाणे मोजणीची कार्यवाही करत असताना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजीपर्यंत व मोजणी कार्यवाही पूर्ण होईपर्यंत 2 महिन्याच्या कालावधीकरीता लागू करण्यात आले आहे. या आदेशानुसार बेकायदेशीर जमाव जमविणे आणि मोजणी करण्यास अडथळा आणणे, शासकीय यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी यांना मोजणी करण्यास विरोध करण, तसेच पाच किंवा पाचहून जास्त लोक एकत्र येणे, ज्या गावाची मोजणी ज्या दिवशी होणार आहे त्या गावातील त्या गटाचे शेतकरी / हितसंबंधीत व्यक्ती खेरीज इतर इसमाना उपस्थित राहता येणार नाही. हा आदेश मोजणी करिता येणारे शासकीय यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी तसेच संपादन मंडळाकडून नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना तसेच ज्या गटाचे मोजणी करण्यात येणारे आहे त्या गटाचे हितसंबंधीत व्यक्ती / शेतकरी यांना मोजणीच्या वेळी उपस्थित राहण्यास लागू राहणार नाही. आदेशाचा कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, ती व्यक्ती भारतीय न्याय संहितेच्या कलम 223 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असे उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर क्र. 1, सदाशिव पडदुणे, यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शुक्रवारी लोकअदालीतचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** 12 सप्टेंबर 2025 रोजी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोकअदालतीमध्ये अपर जिल्हाधिकारी सोलापूर यांचे न्यायालयातील आरटीएस दुसरे अपिल (अर्धन्यायिक) प्रकरणांत तडजोड होऊ शकतील अशी अर्धन्यायिक अपिल प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात येऊन तडजोडीअंती निकाली काढावयाची आहेत. अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालयातील ज्या अर्धन्यायिक अपिल प्रकरणात तडजोड करावयाची आहे अशा अर्धन्यायिक अपिल प्रकरणांबाबत या कार्यालयास दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत कळविण्यास सर्व विधिज्ञ व पक्षकार यांना आवाहन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# महावीर बँकेला ४.६३ कोटींचा नफा - चेअरमन दीपक मुनोत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सर्वसाधारण सभेत बँकेच्या तीन वस्तू स्वमालकीच्या असून मुख्य शाखा करिता कार्पोरेट ऑफिस उभारण्याची सूचना सभासदाकडून करण्यात आली.

सोलापूर येथील बँकिंग क्षेत्रात अल्पवधीतच नावाजलेल्या महावीर सहकारी बँकेचा वार्षिक सर्वसाधारण सभा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न होऊन बँकेला 4.63 कोटीचा निव्वळ नफा झाल्याचे चेअरमन दीपक मुनोत यांनी सांगितले.

बँकेच्या स्वमालकीच्या तीन इमारती असून बँकेचे मुख्य इमारत मुख्य शाखा कार्पोरेट लोक असलेल्या इमारतीत स्थानापन्न व्हावे असे सूचना काही सभासदांनी अग्रेसिव्ह पणे मांडलेले त्या चेअरमन यांनी पूर्ण दात देऊन लवकरच आपण कॉर्पोरेट लुक असलेले ऑफिस उभारू असा शब्द दिला.


सभासदांना यंदाच्या वर्षी 10% लाभांश देण्याकरिता मान्यता देण्यात आली. बँकेने 2012 ला सुरू केलेल्या 38 कोटी ठेवीवरून आज अखेर 520 कोटींचा ठेवींचा पल्ला पार केलेला आहे बँकेचे एकूण जवळपास एक हजार कोटी असा व्यवसाय पूर्ण झालेला आहे त्यामुळे सभासदांनी अभिनंदनचा ठराव मांडला.

महावीर बँकेची ही 28 वे वार्षिक सर्वसाधारण सभा गुजराती भवन येथे संपन्न झाली विद्यमान चेअरमन या वार्षिक सभेचे अध्यक्ष पद भूषविला त्यांच्यासोबत गुरुजी श्री आचार्य नारायण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित सदस्य सुशील कुमार सोनीग्रा राहुल कोरुलकर ज्ञानेश्वर माकल जयंत होले पाटील संतोष भंडारी व अध्यक्ष इंधर्मल जैन यांचा सत्कार करण्यात आला तसेच सामाजिक क्रीडा शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले कीर्तन होरा आदित्य गिरम मोक्षा वेद श्रीधर नादरगी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

बँकेचे सर्व संचालक या सर्व साधारण साबेस उपस्थित होते सभा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाले. सभासदांनी ठेवीदारांनी कर्जदारांनी बँकेवर मोठा विश्वास दाखवला याही पुढे आपल्या विश्वासाला सार्थ राहून बँकेचा व्यवसाय असेच पुढे नेऊ असा वचन बँकेचे चेअरमन दीपक मुनोत यांनी दिला.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भागाकारच्या विरूध्दार्थी शब्द २) तलाव, पाण्याचा साठा असलेली जंगलातील जागा ३) वाईट, डावा ४) मनातील उत्साह ५) दात घासण्यासाठी वापरतात ती एक प्रख्यात टूथपेस्ट ६) पतीची आई ८) एक श्वसनरोग १३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनला आहे १५) मोठा तीळ १६) भाजप पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आडनाव १७) सल उलट लिहा १८) मुलाची मुलगी २०) फोटो (हिंदीत) २१) पुण्यच्या विरूध्दार्थी शब्द २३) पाणी पिण्याची तीव्र इच्छा २४) महाराष्ट्रातील लेण्यांसाठी प्रसिध्द असलेला जिल्हा २६) फळातील गोड द्रव २७) आईची बहीण २८) एक थोर संत ३०) स्वार्थ, हेतू ३२) मदनाची पत्नी ३३) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक ३५) देवतांनी दिलेला आशीर्वाद ३५) मानहानी करणे ३८) व्यायाम, मेहनत ४१) न बोलण्याचे घेतलेले व्रत ४२) पुरूषांच्या ओठावरील केस

**आडवे शब्द :** १) मराठी वर्षाच्या सुरूवातीचा येणारा सण ४) मराठी वर्षातील सुरूवातीचा महिना ५) हा उगळावा तितका काळाच, अशी एक म्हण आहे ७) सहाय्य ९) सब्र का ** मिठा होता है १०) पाठीवर कठीण आवरण असलेला एक उभयचर जीव ११) कबूल, ** असणे १२) खेळ (इंग्रजीत) १४) पक्का, न बदलाणारा निर्णय या अर्थाने १६) छ. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांचे माहेर १९) तीन आणि चार मिळून होणारी संख्या २१) हरिणाचे पिल्लू २२) पानाचा विडा याच्यामुळे रंगतो २४) शेतीची नांगर, पाभार ही अवजारे (ग्रामीण भाषेत) २५) जळण २८) सात गुणिले तीन २९) उलटी, ओकारी ३१) गाणे गाणारा ३२) रसाळ, रसयुक्त ३५) होडी, नौका ३५) एक म्हण-** तेथे माती ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) भीतीने थरथरणे, **** उडणे ४०) एसटीची प्रवासी गाडी ४२) गवंडीकाम वा इतर कामातील कुशल कारागीर ४३) ध्येय साध्य करण्यासाठी या गोष्टी पणाला लावाव्या लागतात-** ** ** ४४) राष्ट्रवादीचे एक नेते-*** पवार

## सुडोकु - 50

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 2 | | 9 | 6 | | | |
| | | 5 | | 1 | 8 | | 3 | |
| 1 | | 6 | 7 | | | | 2 | 4 |
| | 7 | 8 | 9 | | 2 | 1 | | 5 |
| | | | 1 | | 5 | 6 | | 3 |
| | | 1 | | | | | 9 | 8 |
| 9 | 8 | 4 | | 3 | 1 | 7 | | |
| 2 | 5 | | | 4 | 9 | | 8 | |
| 6 | | | | | | | | |

# अकलूजच्या घोडे बाजारात विक्रीसाठी घोडे दाखल



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूजच्या घोडे बाजारात विक्रीसाठी घोडे दाखल होऊ लागले असून,ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासूनच अकलूजच्या घोडे बाजारात परप्रांतीय घोडे व्यापारी आपले घोडे घेऊन दाखल होण्यास सुरुवात झाली आहे.

दिवाळी पाडव्याला अकलूज घोडे बाजाराचे उदघाटन करण्यात येते. परंतु अकलूजचा घोडे बाजार प्रसिद्ध असल्या कारणाने जागा पकडण्यासाठी, गर्दी होण्या अगोदरच विक्रीचा फायदा घेण्यासाठी व्यापाऱ्यामध्ये चढाओढ लागलेली आहे. यावर्षी पाऊस चांगला झाल्यामुळे विक्री चांगली होईल अशी व्यापाऱ्यांना आशा आहे. त्यामुळे एक महिना अगोदरच सुमारे 95 घोडे अकलूज बाजारात आले आहेत. त्यातील 24 घोड्यांची विक्री होऊन सुमारे 25 लाख रुपयांची उलाढालही झाली आहे. सप्टेंबर महिन्या अखेर सुमारे 800 ते 900 घोडे दाखल होतील. ऑक्टोबर च्या सुरुवाती पासून खऱ्या अथार्ने घोडे बाजार फुलू लागेल. कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब, हरियाणा, गुजरात, राजस्थान या भागातून व्यापारी येतील. सुमारे दोन ते अडीच हजार घोडे बाजारात येऊन कमीत कमी 4 ते 5 कोटींची उलाढाल होईल अशी माहिती अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे यांनी माहिती दिली.

आपले जातीवंत 30 घोडे घेऊन बाजारात आलेले बरेली, उत्तर प्रदेशाचे व्यापारी आसिफ म्हणाले, भारतात प्रामुख्याने पंजाबी, सिंधी, मारवाडी, काटियावाडी घोड्यांना चांगली मागणी असते. पंजाबी घोडे वरातीसाठी, थोर्गब्रीड व सिंधी घोडे स्पर्धेसाठी आणी विविध खेळांसाठी, मारवाडी घोडे ब्रिडींग साठी आणी आवड (शौक) म्हणून पाळले जातात. तर थोर्गब्रीड आणी सिंधी घोडे प्रवासासाठी वापरले जातात.

आम्ही सहा महिने उत्तर प्रदेशातून व्यापार करतो. या काळात पंजाब व हरियाणा राज्यातून जातीवंत घोडे खरेदी करतो. त्यानंतर महाराष्ट्रातील अकलूज, सरांगखेडा, मालेगाव, इंदापूर व शिरपूर या बाजारात जाऊन विक्री करतो. 15 घोड्यांची एक खेप यूपी तुन अकलूजला आणण्यासाठी आम्हाला सुमारे 1 लाख रुपये ट्रान्सपोर्टचा खर्च येतो. या घोड्यांच्या देखभालीसाठी, त्यांना फिरवण्यासाठी व नाच शिकवण्यासाठी आम्हाला कामगार ठेवावे लागतात.

अकलूजच्या बाजारात व्यापाऱ्यांची फसवणूक होत नाही. घोड्यांसाठी योग्य निवारा, चारा, पाणी, जनावरांचे डॉक्टर येथे उपलब्ध असतात. कॉम्पुटरराईजड खरेदी विक्रीची पावती केली जाते. त्यामुळे आम्ही अकलूज बाजारात एक महिना अगोदरच माल घेऊन येत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# अकलूज येथे पाच दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अॅन्ड टेक्नॉलॉजी तसेच विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त कौशल्य विकास केंद्र (PM USHA योजने अंतर्गत) आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मार्गदर्शन व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबतची माहिती शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांनी दिली.

या कार्यशाळा बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ पासून रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत उदय सभागृह, शंकरनगर, अकलूज येथे होणार आहे. या कार्यशाळेत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी,महिला बचत गटांसाठी कौशल्य विकास संधी, पॅरामेडिकल क्षेत्रातील कौशल्ये व संधी तसेच राजकीय नेतृत्वातील कौशल्य विकासाच्या संधी, या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच पाचव्या दिवशी इंडस्ट्री व्हिजीट आयोजित केल्या जाणार आहेत. या कार्यशाळेत सहभाग नोंदविल्यास सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.



# लालबागचा राजा विसर्जन विलंबाची चौकशी करा! मच्छीमार समितीची भूमिका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाविरोधात अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने चौकशीची मागणी केली आहे. विसर्जन प्रक्रियेतील गोंधळामुळे गणरायाचे विसर्जन चंद्रग्रहणाच्या वेळी झाल्याने लाखो भक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. तसेच दर्शनादरम्यान भाविकांचा शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याचे आरोपही समितीने केले. समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात ई-मेलद्वारे तक्रार केली आहे. लालबागच्या राजाची स्थापना १९३४ मध्ये कोळी समाजातील महिलांनी केली होती. आता या उत्सवाचे बाजारीकरण झाले असून, भक्तांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप समितीने केला आहे. एका मुलीला दिलेल्या अमानुष वागणुकीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर सर्वसामान्यांच्या सहनशीलतेचा अंत झाल्याचे तांडेल यांनी सांगितले. तक्रारीत मंडळातील जबाबदार सदस्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, दोषी कार्यकर्त्यांना अटक करून सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. व्हीआयपी संस्कृती रोखण्यासाठी दर्शन प्रक्रियेत बदल करून सर्वसामान्यांसाठी सोयीस्कर व्यवस्था करावी, चेंगराचेंगरी टाळण्यासाठी मंडप मोकळा ठेवावा, असेही समितीने सुचवले आहे. श्रीगणेश हे कोणाच्या मालकीचे नसून ते सर्वांचे आहेत. विसर्जनावेळी कोळी बांधवांना डावलण्यात आले, हा कोळी समाजाचा अपमान आहे. 'लालबागचा राजा' पुन्हा समाजाच्या भावनांशी जोडला जावा, अशी मागणी समितीने केली आहे.

# वाशिंबे ते केत्तुर नं.१ रस्त्याची लागली वाट

**वाशिंबे (सचिन भोईटे):-** मौजे वाशिंबे ता.करमाळा जि.प. शाळेपासून ते केतूर न.१ ग्रामा १२५ या चार किलोमीटर रस्त्याची दुरवस्था झाली असून, खड्ड्यातून मार्ग काढत या रस्त्याने वाशिंबे परिसर, केत्तूर १ व गोयेगाव येथील नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. केत्तूर १,गोयेगाव या गावांना तालुक्याला जोडणारा हा मुख्य रस्ता आहे. उजनी बॅक वॉटर लगत गावे असल्याने केळी व ऊस पिकांची याच रस्त्याने मोठी वाहतूक केली जाते. दिवाळीनंतर ऊस सीजन सुरू होणार आहे. त्यामुळे आणखी रस्त्याची दुरावस्था बिकट होणार आहे. वाशिंबे व केत्तुर १ येथे मोठी दोन शैक्षणिक विद्यालय आहेत. शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्या लगत वाढलेली झाडे -झुडपे व खड्डयांमुळे दुचाकीस्वारांना विशेषता धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी खड्डे दिसत नाहीत त्यामुळे अचानक ब्रेक मारल्याने अपघात होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने याची दखल घेत पडलेले खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करावा अशी या परिसरातील नागरिकांकडून मागणी केली जात आहे.



> वाशिंबे ते केत्तुर १ या रस्त्याचे खड्डे ही समस्या गंभीर बनली आहे.त्यामुळे प्रशासनाने तत्काळ दखल घेत खड्डे बुजवावेत.
> **- मयुर झोळ,** वाशिंबे

> रस्त्यांची दुरावस्था झाल्या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत .खड्डे बुजवण्याचे आदेश दिले आहेत. पुढील बजेट मध्ये रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देऊ.
> **- नारायण पाटील,** आमदार करमाळा

> रस्त्या लगत वाढलेली झाडे - झुडपे आठ दिवसांत काढण्यात येतील.व पावसाळा संपताच त्वरित या रस्त्यांवरील खड्डे बुजवले जातील.
> **- अभिषेक पवार,** अभियंता
> सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा


## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६७८/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनीयर डिव्हीजन मा. कुंभार सो यांचे कोर्टात**

१) प्रिती अंकुश लाडे
वय: ५१ वर्षे, धंदा: व्यापार
२) अभिषेक अंकुश लाडे
वय-२५ वर्षे, धंदा- नोकरी
३) आदिती अंकुश लाडे
वय- २८ वर्षे, धंदा- नोकरी
सर्व रा.११/१,साखर पेठ, जुने सिध्देश्वर मंदिर जवळ, सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**
कोणीही नाही. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे अंकुश अशोक लाडे यांचा मृत्यु दि. १९/१०/२०२३ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे कै. अंकुश अशोक लाडे यांचे वारसदार आहेत. अर्जदार नं.१ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसदाखल्याची गरज आहे. वर नमुद अर्जदार क्र. १ ते ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम ३ प्रमाणे वारस असल्याचे जाहीर होऊन मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कै. अंकुश अशोक लाडे यांना अर्जदार क्र.१ ते ३ यांचे व्यतिरिक्त कोणी वारसदार असतील किंवा वर नमुद अर्जाबाबत कोणाचीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसांच्या आत किंवा नेमलेली तारीख दि. ६/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल. अन्यथा पुढील योग्य तो आदेश पारित करण्यात येईल ची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले आहे.
तारीख:१०/०९/२०२५

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: १०२०/२०२४ नि.१८

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ, सिनिअर डिव्हीजन श्रीमती ए एस जाधव सो यांचे कोर्टात**

१) शिवाजी अर्जुन सांळुके
वय : ५९ वर्षे, धंदा : कॉन्ट्रक्टर
रा.धनंजय मांडवे,घर क्र.२०,कॅनॉल रोड,लेन नं. ६,गगनगिरी महाराज मठाजवळ,'कर्वे नगर, पुणे सिटी, पुणे } अर्जदार
(२) सुनिल शिवाजी सांळुके
(मयत वारसदार)
(२-अ) श्रीमती दिपाली सुनिल सांळूके
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम,
(२-ब) रुद्र सुनिल सांळूके
वय : ९ वर्षे, धंदा : शिक्षण,
(अर्जदार नं. २-ब चे अ.पा.क. म्हणून अर्जदार नं. २-अ आई ) दोघे रा. सांगवी (खुर्द) ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
३) श्री. सोमनाथ शिवाजी सांळुके
वय : ३० वर्षे, धंदा : शेती
रा. आत्मज, प्लॉट क्र. ८५० स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर } सामनेवाला

**// विरुध्द //**
कोणी नाही

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं. २-अ चे सासु व २-ब ची आजी व अर्जदार नं. ३ चे आई कै. लता शिवाजी सांळूके हिचा दिनांक ०१/०७/१९९८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोउचार रुग्णालय, सोलापूर येथे मयत झाली आहे. त्यांचे पश्चात त्याची पती व मुले हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही जवळचे वारसदार नाहीत. कै. लता शिवाजी सांळूके हिचे नांवे डि व सब डिया सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील होटगी रोड येथील स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती या भागातील सर्व्हे नंबर २६२ यापैकी प्लॉट नं. ८५० यांसी एकुण क्षेत्र १०५० चौ. फुट जागा असुन त्यामध्ये ३०३५ चौरस फुट मापाची एक खोली असून त्यामध्ये नळ व विजेचे कनेक्शन असुन सदर घरजागेची चतु: सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ७८३,दक्षिणेस : प्लॉट नं. ८५१, उत्तरेस : प्लॉट नं. ८४९ येणेप्रमाणे वर नमुद केलेली घरजागा व त्यातील तदंगभुत वस्तुसह. ही मिळकत कै. लता शिवाजी सांळूके हिचे मालकी व कब्जेवहिवाटीची होती. सदर मिळकतीस यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे वतीने अर्जदार नं. १ यांचे नांव लावण्यासाठी या न्यायालयात प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार हे वरील कै. लता शिवाजी सांळके यांचे वारसदार नाहीत असे कोणास वाटल्यास त्यांनी कागदपत्रानिशी या कोर्टात सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख ०९ / १० /२०२५ रोजी या न्यायालयात हरकती नोंदवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास न्यायालयाने अर्जदार नं. १ ते ३ यांचे वतीने अर्जदार नं. १ यांचे नांवे हेअरशिप सर्टिफिकेट देण्यात येतील. याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.तारीख : १०/०९/२०२५

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६९५/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश एन. ए. मोर साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१) कानीज फातेमा सलीम शेख,
वय - ३४ वर्षे, धंदा : गृहिणी,
२) रुकय्या सलीम शेख,
वय- १३ वर्षे, धंदा: शिक्षण
३) निदा सलीम शेख,
वय- १२ वर्षे, धंदा: शिक्षण
४) अहमद सलीम शेख,
वय- १० वर्षे, धंदा: शिक्षण
५) मोहम्मद सलीम शेख,
वय- ६ वर्षे, धंदा: शिक्षण
अर्जदार नं.१ हे स्वतः करिता व अर्जदार नं.२ ते ५ ची अ.पा.क.आई.सर्व रा.१४/१५टिळक नगर भाग१, मजरेवाडी, सोलापूर-४१३००३. } अर्जदार

**विरुध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं.२ ते ५ चे वडील मयत सलीम अहमद शेख यांचे दिनांक २६/१०/२०२० रोजी राहत्या घरी टिळक नगर, सोलापूर येथे मयत झालेले आहे. मयत सलीम अहमद शेख यांच्या नावे डि व सब डि सोलापूर ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील मजरेवाडी हद्दीतील जुना सर्व्हे नंबर २५०/१ब यांसी नवीन सर्व्हे नंबर ५७/१ब पैकी नियोजीत बापूजी नगर या मधील प्लॉट नंबर १७९ ची मिळकत याचे हद्द पुर्वपश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण क्षेत्रफळ १००० चौरस फुट अथवा ९२.९३ चौ.मी. इतकी आहे. सदर जागेत चार खोल्या पत्र्याचे शेडमारलेली असून वरती पन्हाळी पत्रे घातलेली आहे. यात लाईट कनेक्शन असून त्याचा ग्राहक क्रं.३३०२४३११५३७४३ यांसी सो.म.पा. मिळकत क्रं. ६७१६८६ असे असून यातील अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांचे नांवावर वर्ग होवून मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरचा दाखला सदर अर्जदारांसाठी अर्जदार यांच्या नांवे देण्यास कोणाची कांही हरकत असल्यास, संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अगर पुढील नेमल्या तारखेस या न्यायालयात स्वतः अगर अधिकृत एजंटामार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यानिशी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाची कांही हरकत न आल्यास, या प्रकरणी पुढील हुकूम केले जातील.तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. आज दि.१०/०९/२०२५ रोजी आमच्या सहीनिशी आणि कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.पु नेमलेली तारीख १६/१०/२०२५

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ७०८/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मा. रेडकर सो, यांचे कोर्टात**

१ प्रेमचंद मोतीचंद पानपट
वय- ६७ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
२ संजय मोतीचंद पानपट
वय- ५८ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
दोघे रा. १३२, वजरिया प्लॉट कुमठे दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ व २ चे वडील- मोतीचंद बाबुराव पानपट हे दिनांक १५/०३/२०१३ रोजी व आई- चंचलाबाई मोतीचंद पानपट ही दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत मोतीचंद बाबुराव पानपट यांचे मृत्युपश्चात डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका शहर हद्दवाढ विभागातील ५४ पेठ कुमठा गाव, कुमठा गाव गावठाण येथील भुमापन क्रमांक व उपविभाग २/प्लॉट नं. ५८३/१ मधील घर नं. ११ व ३२ याचे एकत्रित क्षेत्र २५X५०=१२५० चौरस फूट जागा आहे. यांसी सो.म.पा. मिळकत क्र. ५४१३४० असे असून यासी एकत्रित चतु:सिमा खालीलप्रमाणे - पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस: भद्रशेट्टी यांची जागा, उत्तरेस: भूतनाळे यांची जागा, दक्षिणेस: कासार यांची जागा.सदर जागा मयत मोतीचंद बाबुराव पानपट यांचे नांवे सोलापूर महानगरपालिकेत कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद आहे. सदर जागेवर मयत मोतीचंद बाबुराव पानपट यांचे नाव सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद असून मयताचे नाव कमी करून अर्जदार नंबर १ व २ यांच्या नावाची नोंद सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयामध्ये लावण्यासाठी आवश्यक असलेले वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार नंबर १ व २ हे मयताचे वारस नाहीत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली दि.१३/१०/२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत लेखी कागद्पत्राच्या पुराव्यासह या मे कोर्टात हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. नमूद मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदरचे में कोर्ट अर्जदार यांचे नावे हेअरशिप सर्टिफिकेट देणेचा हुकूम करेल त्यानंतर कोणाची काही हरकत चालणार नाही. हे आज दि.१०/९/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिद्धी केले असे.

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ७५६/२०२५ नि.५

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर मे एन ए मोर साो, यांचे न्यायालयात**

१) श्रीमती ललिता मारुती पवार,
वय - ३८ वर्षे, धंदा- घरकाम,
२) श्री. ओमकार मारुती पवार,
वय- २१ वर्षे, धंदा- शिक्षण
दोघे रा. कुंचीकोरवी नगर, गल्ली नं.७, कलिना विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८. } अर्जदार

**विरुध्द**
कोणीही नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं. १ यांचे सासरे व अर्जदार नं. २ यांचे आजोबा शाम किसन पवार हे दिनांक ०९/०१/१९९८ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार नं.१ यांची सासू व अर्जदार नं.२ यांची आजी जानूबाई शाम पवार हे देखील दिनांक १६/१२/२०११ रोजी मृत्यु झालेला आहे. त्यामुळे अर्जदार नं. १ व २ यांनी सदर कै. शाम किसन पवार यांचे मालकीची मिळकत डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील सर्व्हे नं.२३२ यांसी प्लॉट नं.३०/४ यांसी पुर्व-पश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण क्षेत्र १००० चौ. फुट इतके असून, यांसी मालमत्ता क्र.६६१८७४ असा असून यांसी चतु:सिमा:- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट नं.३९, दक्षिणेस :- प्लाट नं.३१, उत्तरेस :- प्लॉट नं. २९, सदर मिळकतीबाबत त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख १६/१०/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे.न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.आज दि. १०/०९/ २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६७३/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश एन. ए. मोर साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१ तराबी फरीद शेख
वय- ६४ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
रा. २७८, कुमठे गांव उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
२) सैफन फरीद शेख
वय- ४४ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा.२७८,माने गल्ली, कुमठे गांव उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
३ घुडुबाई फरीद शेख
वय- ४६ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा. २७८, कुमठे गांव उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
४ मुबारक घुडुभाई शेख
वय- ६६ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा. २२/२, काजल नगर, होटगी रोड, जि. सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील व अर्जदार नं. ४ चे भाऊ - फरीद उर्फ फरद्दीन घुडुभाई शेख हे दिनांक १०/०४/२००६ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत फरीद उर्फ फरद्दीन घुडुभाई शेख यांचे मृत्युपश्चात डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका शहर हद्दवाढ भागातील ५४ पेठ, कुमठा गाव मधील प्लॉट नं. २७८A याचे क्षेत्र ६०X४० = २४०० चौरस फूट घरजागा आहे. यांसी सो.म.पा. मिळकत क्र. ५४०७८६ असे असून यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे- पूर्वेस : मारुती सोनटकले यांची जागा, पश्चिमेस: रस्ता, उत्तरेस: मठाची खुली जागा, दक्षिणेस: म्हताब शेख यांची जागा. सदर जागा मयत फरीद उर्फ फरद्दीन घुडुभाई शेख व त्यांचे भाऊ अर्जदार नं. ४ यांचे नावे सोलापूर महानगरपालिकेत कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद आहे. सदर जागेवर मयत फरीद उर्फ फरद्दीन घुडुभाई शेख यांचे नाव सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद असून मयताचे नाव कमी करून अर्जदार नंबर १ ते ४ यांच्या नावाची नोंद सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयामध्ये लावण्यासाठी आवश्यक असलेले वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार नंबर १ ते ४ हे मयताचे वारस नाहीत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली दि. १६ / १० / २०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह या मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. नमूद मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदरचे मे. कोर्ट अर्जदार यांचे नावे हेअरशिप सर्टिफिकेट देणेचा हुकूम करेल त्यानंतर कोणाची काही हरकत चालणार नाही. हे आज दि. १०/०९ /२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिद्धी केलेअसे.

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६७७/२०२५ नि.६

**सोलापूर येथिल मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्थर श्रीमती व्हि ए कुलकर्णी सो यांचे न्यायालयात**

१. श्री . किशोर बाळू रणधीरे,
वयः ३९ वर्षे, धंदाः मजुरी,
२ . सौ . सुनिता बाळू रणधीरे,
वयः ५४ वर्षे, धंदाः घरकाम,
३ . कु . अक्षय बाळू रणधीरे अज्ञान तर्फे अ. पा. क. आई सौ. सुनिता बाळू रणधीरे,
४ . सौ . ज्योती गजानण रणधीरे,
वयः ३६ वर्षे, धंदाः घरकाम,
५. कुमारी . श्वेता गजानण रणधीरे,
वयः २० वर्षे, धंदाः शिक्षण,
६ . कुमारी . सपना गजानण रणधीरे
वयः १८ वर्षे, धंदाः शिक्षण,
७. कु. सुमित गजानण रणधीरे अज्ञान तर्फे अ. पा. क. आई सौ. ज्योती गजानण रणधीरे,
सर्व रा.: २३०, अम्बेडकर नगर, होटगी रोड, उत्तर सोलापूर, सोलापूर .
८. सौ. सुरेखा कुमार लोंढे,
वयः ५१ वर्षे, धंदाः घरकाम,
रा. १६०/ब हरिजन वस्ती संगदरी, दक्षिण सोलापूर, सोलापूर .
९. सौ . सीता रामचंद्र गायकवाड,
वयः ४९ वर्षे, धंदाः घरकाम,
रा. मु.पो. वाघोली, सोहळे, इंदिरा नगर, सोलापूर . } अर्जदार

**विरुध्द**
कोणी नाही } सामनेवाला

१. यातील अर्जदार नं. १, ३, ८ व ९ हे कै. बाळू कृष्णा रणधीरे यांचे मुलं आहेत व नात्याने भाऊ बहीन लागतात . अर्जदार नं. २ ही कै. बाळू कृष्णा रणधीरे यांची पत्नी आहे . अर्ज दार नं. ४ ही कै. बाळू कृष्णा रणधीरे यांची सुन आहे व अर्जदार नं. ५ ते ७ हे कै . बाळू कृष्णा रणधीरे यांचे नात नातु आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ९ हे वर नमुद पत्यावर राहण्यास आहेत. यातील अर्जदार नं. १ चे पिता कै. बाळू कृष्णा रणधीरे यांचे दि. १७. ०१. २०२० रोजी श्री. छ. शि. म. सर्वोपचार रूग्णालय सोलापूर येथे निधन झाले. कै. बाळू कृष्णा रणधीरे यांच्या मृत्युपश्चात अर्जदार नं. १ ते ९ हे कायदेशीर वारस आहेत.

२ . यात अर्जदार नं . १ यांनी दि. ०३.०५.२०२५ रोजी मा. विभाग नियंत्रक, सोलापूर येथे लद-पागे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने अर्ज करून कै. बाळू कृष्णा रणधीरे यांच्या जागे सफाईकामगार म्हणुन नियुक्ती व्हावी म्हणून अर्ज दाखल केला होता. त्यावर सदर कार्यालयाकडून अर्जदार नं. १ हे कै. बाळू कृष्णा रणधीरे यांचे वारस आहेत असे मे. न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र दाखल करण्यास सांगीतले. सबब अर्जदार नं. १ ते ९ यांनी कै. बाळू कृष्णा रणधीरे यांचे कायदेशिर वारस आहोत हे घोषित होऊन मिळणे करिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३ . त्याअर्थी सदर अर्जाचे कोणाचेही कसल्याही प्रकारचे हरकत अथवा म्हणणे असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ३० तीस दिवसांच्या आत किंवा पुढल नेमलेल्या तारखेस दि. १४. १०. २०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचेही हरकत न आल्यास कोणचेही काही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी केली जाईल व अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणपत्र दिले जाईल. याची नोंद घ्यावी.आज दिनांक १० माहे ०९ सन २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले आहे .

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ७६९/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हिजन मे एन ए मोर सो यांचे कोर्टात.**

श्री.अजयकुमार रामगोपाल नल्ला
वय : ६७ वर्षे, धंदा : व्यापार
रा. ३४/२/६१ न्यु पाच्छा पेठ,सोलापूर.
मो.नं.८८५७०६०४४०. } अर्जदार

**विरूध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे भाऊ कै. वेणु रामगोपाल नल्ला हे दि.०२/०८/२०२४ रोजी मयत झालेले आहे. कै. वेणु रामगोपाल नल्ला यांचे मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी ता.उत्तर सोलापूर पैकी न्यु पाच्छा पेठ येथील सि.स.नं.१०३८८/३४/२/६१- ब यांचे फायनल प्लॉट नंबर ३४/२, सब प्लॉट नंबर ६१ब यांचे एकूण क्षेत्र १४३.५० चौ.मी या जागे पैकी ८३.५७ इतकी जागा असून सदर जागे मध्ये अर्जदाराचे व मयत कै. वेणु रामगोपाल नल्ला यांचा १/२ हिस्सा आहे.

त्याआर्थी यदाकदाचित वरील मिळकत संबंधी वारस दाखला मिळणेबाबत कोणाची हरकत असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत अथवा पुढील नेमलेली ता.१६/१०/२०२५ रोजी स्वतः अथवा वकिलामार्फत अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे दयावे. मुदतीत कोणाचीही तक्रार अथवा हरकती आल्या नाहीत तर मे न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारित करतील. ही जाहीर प्रसिध्दीकरण केले
ता.१०/०९/२०२५

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय व.स्तर,सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ७१५/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो, यांचे कोर्टात**

हुसेनशा इमामसाहेब मकानदार वय : ५७ वर्षे, धंदा : मजुरी, रा. रेवणसिध्देश्वर नगर, होटगी रोड, } अर्जदार
कोणी नाही, } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे वडील इमामशा दिवानशा मकानदार ह दि.१०/०४/२०२५.रोजी सोलापूर येथे मयत झाले व तसेच अर्जदार यांचे आई हमीदा इमामसो मकानदार हे दिनांक १६/०५/२०२२ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहे. इमामशा दिवानशा मकानदार यांचे नावे असलेली डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका नवीन हद्दीतील पेठ कुमठे गावे येथील सर्व्हे नं. १७५/२ पैकी रेवणसिध्देश्वर नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. २५४ व २५६ यांसी एकूण क्षेत्र १६०० चौ.फुट ची घरजागा व उर्वरीत खुली जागा ही मिळकत आहे. त्यामुळे सदर अर्जदार यांनी त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख १६/१०/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.आज दि.८/९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन सि.ज.सि.ड

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ७७२/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर मर्ढेकर सो, यांचे कोर्टात**

(१) अजमतबी हबीबोद्दिन उंटवाले वयः- ७४ वर्षे,धंदा:- घरकाम,
(२) नजमोद्दिन हबीबोद्दिन उंटवाले वयः- ४८ वर्षे,धंदा :- मजुरी, } अर्जदार
(३) अयाजोद्दिन हबीबोद्दिन उंटवाले अर्जदार वयः-४३ वर्षे, धंदा :- मजुरी,
(४) रियाजोद्दिन हबीबोद्दिन उंटवाले वयः-४१ वर्षे, धंदा:- मजुरी, सर्व रा. प्लॉट नं. ४४६, थोबडे नगर, एम.आय.डी.सी. रोड, निलम श्रमजिवी नगर, सोलापुर

**विरूध्द**
कोणी नाही. } सामनेवाला

मिळकतीचे वर्णन:- डि व सब डि II सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर व सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील थोबडे नगर मधील घर जागा यांसी जुना सर्व्हे नं. २३१ पैकी प्लॉट नंबर ४४६ असे असून याचे हद्द पूर्व पश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण क्षेत्र १००० चौ. फुट इतकी घरजागा यामध्ये दोन खोल्या, संडास बाथरुम, लाईट व नळ कनेक्शनसह असलेली घरजागा त्याचा सोलापुर महानगरपालिका येथील मिळकत क्रं.६८०३५२ असा असुन यांसी चतु:सिमा- पुर्वेस :- लक्ष्मीनारायण तलकोक्कुल यांची घरजागा, पश्चिमेस:- रस्ता, दक्षिणेस:- प्लॉट नं.४४५, उत्तरेस :-प्लॉट नं.४४७ येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तद्‌गभूत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमूद अर्ज कलम १ मध्ये वर्णन केलेली संपूर्ण घरजागा ही पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांची मालकी कब्जे वहीवाटीची होती व आहे. यातील पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले हे दिनांक २६/०४/२०१७ रोजी प्लॉट नं. ४४६, थोबडे नगर, सोलापुर येथे मयत झालेले आहे. अर्जदार नं. १ ही मयत पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांची पत्नी असून अर्जदार न २ ते ४ ही मुले आहेत. पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांना अर्जदार नं. १ ते ४ यांच्याशिवाय कोणतेही कायदेशीर वारसदार नाही. सदर वर नमूद मिळकत ही पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांची मालकी वहिवाटीची असून त्यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार नं. १ ते अर्जदार नं. ४ हे मयत पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांच्या वर नमुद मिळकतीमध्ये वारसदार या नात्याने हक्क प्राप्त होतो. यातील अर्जदार नं. १ ते ४ यांनी पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारसा दाखला (Hereship Certificate) मिळणेसाठी या मे.कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी पै. हबिबोद्दीन अमीरोद्दीन उंटवाले यांना कोणी कायदेशीर वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अथवा पुढील नेमलेली तारीख १५/१०/२०२५ रोजी स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत हजर होवून आपली लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीहि कसलीहि हरकत न आल्यास मे.कोर्ट अर्जदार नं. १ ते ४ यांचे नांवे वारसा प्रमाणपत्र (Hereship Certificate) देण्याचे पुढील हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस आमच्या सही व कोर्टाचे शिक्यानिशी आज दिनांक ८ माहे ९ इसवी सन २०२५ रोजी प्रसिध्द केले असे.

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ.स्तर सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि.कि.अर्ज.नं. ३१९/२०२५ नि-७

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हीजन (मे.व्ही.पी.कुंभार साो) यांचे कोर्टात**

१) श्रीमती अंबुबाई शिवाजी गोगी वय-५२वर्षे,धंदा- घरकाम,
२) श्री.विनायक शिवाजी गोगी वय-२५ वर्षे, धंदा- शिक्षण,
३) श्री.अभिषेक शिवाजी गोगी वय- २२ वर्षे, धंदा- शिक्षण, सर्व रा. ३६२, बापूजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर } अर्जदार
सध्या सर्व रा. ९१, मिनाक्षी साने विडी घरकुल, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**विरूध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ चे पती व नं.२ व ३ यांचे पिता नामे शिवाजी इरप्पा गोगी यांचे दि.२३/११/२००३ रोजी सोलापूर येथील राहत्या घरी निधन झाले आहे. तसेच मयत शिवाजी इरप्पा गोगी यांचे आई-वडिलांचे देखील यापुर्वीच निधन झाले आहे. मयत शिवाजी इरप्पा गोगी यांचे मालकी वहिवाटीचे व त्यांचे नांवे असलेले **मिळकतीचे वर्णन**- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे मधील ''बापूजी नगर '' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील गाळा/भुखंड क्रमांक २९२ इमारत क्रमांक ४५ यांसी सो.म.पा. मिळकत क्रमांक १७४४७१ याचे एकुण क्षेत्र १६.१२ चौ. मीटर अशी घरजागा मिळकत. येणेप्रमाणे घरजागा मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तुसह. येणेप्रमाणे वरील मिळकतीचे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयाच्या दप्तरी / रेकॉर्डला व सोलापूर महानगरपालिकेकडील कर आकारणी व कर संकलन विभागाच्या दप्तरी मयताचे वारसदार म्हणुन अर्जदार नं.१ ते ३ यांचे नांवाची नोंद होणेकामी वारसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, जर कोणास वरील अर्जदार यांच्या नांवाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेली ता.१४/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर रहावे. तसे न झाल्यास, अर्जदार यांचे नांवाने वारसा प्रमाणपत्रास कोणाची कांही हरकत नाही, असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे. ता. ०८/०९/२०२५

सही/-लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज. ६९९/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन श्रीमती व्ही.ए.कुलकर्णी साो, याचे कोर्टात**

१)सकीना अकबर शेख,वय:८५वर्षे, धंदा : कांही नाही,
२)महमद अकबर शेख,वय : ६१ वर्षे, धंदा : मजूरी,
३)हुसेनबाशा अकबर शेख,वय ५२ वर्षे, धंदा : मजूरी,
सर्व रा.११३/५, अक्कलकोट रोड, सुतमिल जवळ, पडगाजी नगर, सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी खालील नमुद मिळकत यातील अर्जदार नं. १ याचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे जनक पिता अकबर दस्तगीर शेख यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची होती, ते दि.१२/०१/२००३ रोजी मयत झालेले आहेत. मयताचे आईवडील यापूर्वीच मयत झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ ते ३ यांचे नांवे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

१) मिळकतीचे वर्णन : डि।। व सब डि।। सोलापूर व तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील, पडगाजी नगर भाग-२, अक्कलकोट रोड, सुत मिल जवळ, सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील घर जागा यांसी प्लॉट नं. ४ यांसी एकूण क्षेत्र ५०० चौ.फुट. असुन यात एक पत्र्याचा शेड असुन बाकीची खुली जागा यांसी महानगरपालिका मिळकत.क्र.५८२६०६. यासी चतु:सिमा खालील प्रमाणे : - पुर्वेस : राहती घरजागा, पश्चिमेस : रस्ता,दक्षिणेस : संहती घरजागा उत्तरेस : राहती घरजागा येणे प्रमाणे चतु:सिमेतील घरजागा आतील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तुसह, इजमेंटच्या सर्व हक्कासह व वहिवाटीच्या सर्व हक्कासह.त्याअर्थी यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख १८/०९/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदऊन वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे. कोर्ट अर्जदारांचे नावे हेअरशिप सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.हे जाहीर प्रसिध्दीकरण दिलें ता १०/०९/२०२५

सही/- क.लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन सोलापूर

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: SLP/02486/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:-८४६/२०२५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर.**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट बोराळे बाबत ।
न्यासाचा पत्ता:- सर्वे नं. १४१, १४२, १४३ अट पोस्ट बोराळे, टालुक मंगळवेढे, डिस्ट्रिक्ट. सोलापूर, सोलापूर, मंगळवेढे, बोराळे
अर्जदार-नितीन राजाराम नकाते,

सर्व संबंधित लोकास जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य | अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Tal Pithalche 20 Nag | 2500.00 | 7 | Samaie Pithalche 2 Nag | 2000.00 |
| 2 | Vina 2 Nag | 3000.00 | 8 | Chandiche Top 2 Nag | 40000.00 |
| 3 | Mrudung 03 Nag | 8000.00 | 9 | Mangalsutra 0.5 Gram | 4000.00 |
| 4 | Speakar Set | 15000.00 | 10 | Shikar Kalas 2 Nag | 7000.00 |
| 5 | Pthali Ghanta 5 Nag | 12000.00 | 11 | Devasthanche Swaipak Bhande | 150000.00 |
| 6 | Chat Fanka | 10000.00 | 12 | Jevan Table Khurchi | 220000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. ४७३५००/- मात्र(अक्षरी रुपये चार लाख त्र्याहत्तर हजार पाच शे मात्र फक्त) स्थावर मिळकत (वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| At Post Borale, Tq.Mangalvedha, Dist. Solapur | City Survey No.141 | 394 Sq.Mtr. | No | Temple | 0.00 |
| At Post Borale, Tq.Mangalvedha, Dist. Solapur | City Survey No.142 | 19.5 Sq.Mtr. | No | Temple | 0.00 |
| At Post Borale, Tq.Mangalvedha, Dist. Solapur | City Survey No.143 | 19.5 Sq.Mtr. | No | Temple | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०९-०९-२०२५ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का) अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापुर.

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन,पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ,रेल्वेलाईन्स,सोलापूर ४१३००१

**नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग, सो.म.पा.**

ई मेल-smcroadsection@gmail.com मो.नं.9423992748

जा.क्र.नगर अभियंता/रस्ते विभाग/२०२५-२६/१२२४ दि. ०९/०९/२०२५

ई- निविदा सूचना क्र. /२०२५-२६

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम २५-२६ अंतर्गत खालील कामाचे ई- निविदा बाबत.

१. टेंडर आय डी २०२५_SMC_१२१६६१२_१
२. टेंडर आय डी २०२५_SMC_१२१६६१४_१
३. टेंडर आय डी २०२५_SMC_१२१६६१६_१

वरील कामाचे निविदा:http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.१०/०९/२०२५ ते १८/०९/२०२५ पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

सही/- प्र.नगर अभियंता सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## जाहिर प्रसिध्दीकरण

दि.कि.अ.नं. ८३/२०२५ नि.नं.६

**माढा येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर साहेब, यांचे न्यायालयात**

१.स्वाती औदुंबर पाटील, वय-४५ वर्षे, धंदा घरकाम रा. पिंपळनेर ता. माढा जि.सोलापूर
२.जान्हवी औदुंबर पाटील, वय १९ वर्षे, चंदा-शिक्षण, रा. पिंपळनेर ता. माढा जि.सोलापूर
३.शांभवी औदुंबर पाटील, वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण,
४.देवराज औदुंबर पाटील, वय-०८ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान अर्जदार क्र.३ व ४ करिता अ.पा.क.अर्जदार क्र.१ आई } अर्जदार
५.चंद्रकला भालचंद्र पाटील वय ६३ वर्षे, धंदा घरकाम रा. पिंपळनेर ता. माढा जि.सोलापूर

**विरूध्द**
निरंक } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडिल व अर्जदार क्र.५ यांचा मुलगा मयत औदुंबर भालचंद्र पाटील हे दिनांक २५/०७/२५ रोजी पिंपळनेर ता. माढा जि.सोलापूर येथे मयत झालेले असून त्यांना वारस यातील अर्जदार हेच असून मयतास अर्जदाराशिवाय अन्य कोणीही कायदेशिर वारस नाहीत. अर्जदार यांना मयत औदुंबर भालचंद्र पाटील यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी हेअरशिप / वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे, असे कथन अर्जदाराने अर्जात नमुद केले आहे.

ज्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमुद मागणी संबंधाने, कथनासंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशिर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस व मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले तारीख १०/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितीगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व ते कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. तारीख-९/९/२०२५

सही/- लिपीक (शिक्का) सही/-सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय, क स्तर माढा

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ६८५/२०२५ नि-६

**सोलापूर येथील मे दिवाणी न्यायाधीश व.स्तर श्री.एन.ए. मोर साो,यांचे न्यायालयात**

१) सौ.राजश्री पती श्रीशैल विजापूरे वय-४७ वर्षे धंदा- खाजगी नोकरी
२) श्री. दिपक पिता श्रीशैल विजापूरे वय-२७ वर्षे धंदा -शिक्षण } अर्जदार
३)श्री.दिनेश पिता श्रीशैल विजापूरे वय-२६ वर्षे धंदा-शिक्षण
४) कू. मेघा पिता श्रीशैल विजापूरे वय - २० वर्षे धंदा - शिक्षण रा. १ ते ४-१०, म्हाडा कॉलनी, स्नेह संवाद नगर, जूळे सोलापूर, शहर व जिल्हा - सोलापूर

**विरूध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती तर २ ते ४ यांचे वडील श्री. श्रीशैल गुरुलिंगप्पा विजापूरे हे दिनांक ०५/१०/२०१५ रोजी शहर सोलापूर येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारसदार आहेत. सदर मयत यांनी त्यांचे हयातीमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे विमा पॉलिसी क्रमांक ९९०१५५६९७ हा घेतलेला होता. त्यामूळे विमा पॉलिसीचे र.रू. १,२०,०००/- मिळणेकामी सेक्सेशन/वारसा प्रमाणपत्र घेवून येणेचे लेखी पत्र अर्जदाराना सदर कार्यालयाने दिलेले आहे. त्यामूळे अर्जदार यांनी सदर मयताचे पश्चात सदर विमा रक्कम मिळणेसाठी कायदेशीर वारस असल्याचे जाहीर होवून, सेक्सेशन / वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज हा दाखल केला आहे.

त्याअर्थी, जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने सेक्सेशन/वारसा प्रमाणपत्र देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १६/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी म्हणणे मांडवे, सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, कोणाची काही हरकत नाही असे समजून मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली असे. दिनांक- ०९/०९/२०२५

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायाधिश,व.स्तर सोलापुर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज.नं. ७३९/२०२५ नि-५

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनीअर डिव्हीजन श्री.एन.ए. मोर साो,यांचे कोर्टात**

१)श्रीमती अनुसया भानुदास गडदे,
वय-५५ वर्षे, धंदा- घरकाम,
२)श्री. राहुल भानुदास गडदे
वय - ३४ वर्षे, धंदा-मजुरी
३)राणी भानुदास गडदे (लग्नापूर्वी)
दोघे मु.पो.औज मंद्रुप,ता.दक्षिण सोलापूर,जि.सोलापूर
सौ. राणी मल्लिकार्जुन माने (लग्नानंतर)वय-३३वर्षे, धंदा-घरकाम,रा.रेवागांव,विजयपुरा,राज्य कर्नाटक
४)श्री. रोहित भानुदास गडदे,वय-२८ वर्षे, धंदा- नोकरी, रा. मु.पो. आज मंडप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर } अर्जदार

**विरूध्द**
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील कै. भानुदास लायप्पा गडदे यांचे दि.२७/०५/२०१२ रोजी मयत झाले असून कै. भानुदास लायप्पा गडदे हे कादरी प्रशाला औज मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथे सह. शिक्षक या पदावर नोकरीस होते त्यांचे जागेवर अर्जदार नं. २ यांना अनुकंपातत्वार नोकरी मिळणेकरीता वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कोणाची वर नमूद अर्जदारांना वारसप्रमाणपत्र मिळण्यास हरकत असल्यास हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली तारीख ०६/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर होऊन आपले म्हणणे सादर करावे, मुदतीत कोणाची हरकत न आलेस पुढील योग्य ती कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.१०/०९/२०२५

सही/- लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक सि.ज.सि.डि.सोलापूर